म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र.

९९५८




# लॉर्ड बेडन पॉवेल

REFBK-0009860

कॅ. द्वा. ब. केळकर

साधु ग्रंथ प्रकाशन, कोल्हापूर

स्काउट / गाईड चळवळीचे जनक–

# लॉर्ड बेडन पॉवेल

( चरित्र )

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २३५९९ वि: चरित्र
क्रमांक ८७८ नों: दि: ९-१-१९६५

लेखक . Sc., B. T.
सांगली ( द. सातारा )
कूल
ो. टी. आय्. सांगली

REFBK-0009860

८८५०

महाराष्ट्र ग्रंथ भांडार प्रकाशन,
कोल्हापूर १

एप्रिल १९५८ ] –*– [ मूल्य १। रुपाया

| विषय | पृष्ठांक |
|---|---|


**अनुक्रमणिका** .... .... .... २

प्रस्तावना .... ... .... .... ३

लेखकाचे चार शब्द ... .... .... ४

अर्पण-पत्रिका .... .... ... ७

छोटा ' स्टे ' .... ... ... ९

' बी. पीं.'चें शालेय जीवन ... .... १५

हुशार पलटणीचें नेतृत्व .... .... २२

आफ्रिकेतील नेमणूक व रजेचा काळ ... .... २९

पुनश्च आफ्रिकेंमध्यें .... ... .... ३४

गोल्ड कोस्ट व माताबेली लँड .... .... ३९

मेफकिंगचा वीर .... .... .... ४८

थोर सेनानीचा जयजयकार .... ... ५५

दुसऱ्या जीवनाची सुरुवात ... .... ५९

विवाह व स्काउटिंगचा प्रचार .... .... ६८

तुफानी प्रचार—जगाची मान्यता .... .... ७५

अखेरचे दिवस व अन्तिम सन्देश .... .... ८१



प्रकाशक व मुद्रकः—

**गो. वा. कुलकर्णी**, सेवा मुद्रणालय, १६७ बी,

जोशीराव वाडा, कोल्हापूर.

# प्रस्तावना

ख्रिस्तवासी लॉर्ड बेडन पॉवेल यांचें चरित्र जगांतील प्रचलित अशा सर्व भाषांमध्यें लिहिलें गेलें आहे. अनेक भाषांमध्यें आतांपावेतों बरींच पुस्तकें स्काउट चळवळीवर व तसेंच आद्य संस्थापक लॉर्ड पॉवेल यांचे चरित्रावरहि लिहिलीं गेलीं आहेत. श्री. द्वा. वा. केळकर, सांगली यांचा प्रस्तुतचा प्रयत्न मराठी वाङ्मयामध्यें लॉर्ड बेडन पॉवेल यांचें चरित्र नमुनेदार पद्धतीनें लिहून वाचकांना स्काउट चळवळीसंबंधीं व तिच्या पवित्र ध्येयासंबंधीं माहिती द्यावी असा आहे.

स्काउट चळवळ ही एक जागतिक अशी ध्येयवादी चळवळ आहे. या चळवळीचे मुख्य असे दहा नियम आहेत. खरा स्काउट हा प्रत्येकाचा मित्र आहे. मुक्या प्राण्याला देखील माणुसकीनें वागविणें हें त्याचें आद्य कर्तव्य आहे. त्यासच चिकटून राहणें यांत स्काउट हा आनंद मानतो. ' रंजिले, गांजिले ' अशा लोकांना सहानुभूतिपूर्वक मदत करणें व त्याबद्दल कोणत्याहि प्रकारची बक्षिसाची आशा न बाळगणें हें स्काउटचें भूषण ठरतें. दररोजच्या साध्या गोष्टींकडे दुर्लक्ष न करतां जगांतील अखिल मानवप्राणी हा एकमेकांशीं बंधुभावानें व बंधुप्रेमानें कसा राहूं शकतो त्याबद्दलचा आविष्कार जागतिक स्काउट चळवळीमध्यें पाहावयास सांपडतो. लॉर्ड बेडन पॉवेल यांचें चरित्रहि लहान सहान गोष्टींमधून मोठ्या गोष्टी कशा रीतीनें प्राप्त करून घेतां येतात याचें चांगलें उदाहरण आहे. अशा थोर, मानवतेचें प्रतीक बनलेल्या गृहस्थांचें चरित्र मराठी वाङ्मया-मध्यें प्रसिद्ध होत आहे ही आनंदाची गोष्ट आहे.


श्री. केळकर यांनीं लिहिलेलें हें चरित्र अत्यंत आकर्षक असें आहे. प्रत्येक प्रकरणास त्यांनीं दिलेलें शीर्षक हें वाचकांना कुतूहल निर्माण करण्यास समर्थ ठरतें. त्यामुळें वाचकांचें लक्ष तें पुस्तक वाचून पुरें करण्याकडे आपोआपच जातें. त्यांनीं वापरलेली भाषा अत्यंत आकर्षक अशी आहे. त्यांचा हा प्रयत्न अत्यंत यशस्वी झाला आहे, यांत शंका नाहीं.

सांगली,<br>
ता. २३।४।५८.

ॲडव्होकेट **केशवराव चौगुले**<br>
डिस्ट्रिक्ट कमिशनर (स्काउटस्)<br>
सांगली. (द. सातारा)

# लेखकाचे चार शब्द

दिनांक २२ फेब्रुवारी १९५७ या दिवशीं स्काऊट / गाईड चळवळीचे जनक लॉर्ड बेडन पॉवेल यांची जन्मशताब्दि सर्व जगभर मोठ्या समारंभानें साजरी करण्यांत आली. सर्व वयाच्या स्त्री-पुरुषांनीं आणि गणवेषधारी लक्षावधि बाल-बालिकांनीं जगाच्या या 'चीफ स्काउटना' आदरांजलि अर्पण केली. हा समारंभहि अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण असा होता. स्काउट संस्थेच्या निळ्या निशाणाखालीं—



असा फलक ठेवलेला असे आणि आदरांजलि वाहण्यास येणाऱ्या पथकाचे प्रमुख आपल्या हातांतील फुलांचा गुच्छ किंवा फुलें ओंजळीनें 'बी. पी.'च्या स्मृतिफलकावर अर्पण करीत असत; आणि मग स्काउट-प्रतिज्ञेचा सामुदायिक रीतीनें पुनरुच्चार होई.

जगांत लहानथोर माणसें जन्मास येतात आणि मरतात. पण अशा-प्रकारची आदरांजलि मिळण्याचें भाग्य क्वितीशा थोर विभूतींना मिळालें

असेल? कवि लॉंगफेलोनें म्हटल्याप्रमाणें 'भवसागरींच्या वाळवंटी' आपलीं अमिट पदचिन्हें उमटवून बेडन पॉवेल हे निघून गेले आहेत. आजहि कोट्यवधि अनुयायी त्यांनीं दाखवून दिलेल्या मार्गानें वाटचाल करीत आहेत. 'असा कोणता जीवनाचा नव-मार्ग 'बी. पीं.'नीं शोधून काढला?' असा प्रश्न साहजिकपणेंच मनांत उद्भवतो. त्याचेंच उत्तर या पुस्तकामध्यें देण्याचा यत्न केला आहे.

'बी. पी.' यांचें चरित्र अत्यंत स्फूर्तिशाली आहे. 'बी. पी.'चें चरित्र वाचून जीवनाकडे पाहाण्याची व सुखदुःखांबद्दल विचार करण्याची नवी दृष्टि आपणांस येईल. सर्वांना आनंद देण्याचा यत्न करीत व स्वतःच्या सुखी जीवनाचा अनुभव घेत घेत, भूतलावरून हळूंच कसें निघून जावें; हें सांगण्याचें महत्कार्य हें चरित्र करील. पशुपक्ष्यांना जर वाचा असती तर त्यांनीं सुद्धां 'बी. पीं.'च्या बद्दल कृतज्ञता व्यक्त केली असती. त्यांचे ते सच्चे मित्र होते. 'पशुपक्ष्यांवर बंदूक चालविण्यापेक्षां कॅमेरा चालवा,' असें ते म्हणत. प्राणिसृष्टीकडे व वनस्पतिसृष्टीकडे चौकस आणि सहानुभूतिपूर्ण दृष्टीनें पाहावयास त्यांनींच आम्हांला शिकविलें.

अशा जगन्मान्य थोर पुरुषाचें चरित्र वाचावयास आपण साहजिकपणेंच आतुर व्हाल. एकच गोष्ट आपणांस सांगावीशी वाटते. 'बी.पी.' हे जन्मानें परकीय आहेत, या एकाच गोष्टीनें त्यांच्या चरित्राकडे दूषित दृष्टीनें पाहिलें जाऊं नये. मानवानेंच पृथ्वीवर या देशांच्या सरहद्दी निर्माण केल्या. आपल्या मातृभूमीबद्दल मनांत प्रेमभाव असणें ही स्वाभाविक गोष्टच आहे. 'बी. पीं.'ना इंग्लंडचा अभिमान होता—ब्रिटन तर त्यांना 'राष्ट्रवीर' मानतेंच; पण मानवतादेवीचे पण 'बी. पी.' हे थोर सुपुत्र होते. साऱ्या मानवजातीवर त्यांनीं प्रेम केलें. म्हणूनच जगानें त्यांना आदरांजलि वाहिली.

**आभार:**—मला हें चरित्र लिहिण्याची प्रेरणा श्री. धों. सी. भागवत; स्टेट ऑर्गनायझिंग कमिशनर; बॉंबे स्टेट यांनींच दिली. "बी. पी."च्या-वर त्यांचा एक लेख 'Bombay Bharat Scout,' मध्यें आला होता; तोच या पुस्तकाचा जनक! हें चरित्र लिहितांना अनेक पुस्तकांचा मला उपयोग झाला. त्यांचा उल्लेख येथें करणें स्थलाभावीं शक्य नाहीं. मात्र त्या सार्‍या ग्रंथकर्त्यांचें ऋण मी मान्य करतों. या पुस्तकांत वापरण्यासाठीं स्काउट संस्थेनें चित्रांचे कांहीं ब्लॉक्स माझ्या विनंतीवरून पाठवून दिले, त्याबद्दल ऑ. स्टेट सेक्रेटरी श्री. पदम्. एस्. पावरी व त्यांचे मदतनीस श्री. गिल्डर यांचे आभार मानतों. तसेंच सांगलीचे डि. क. श्री. केशवरावजी चौगुले यांनीं वेळांत वेळ काढून मला प्रस्तावना लिहून दिली; त्याबद्दल त्यांचा मी सदैव ऋणी आहें. माझे मित्र श्री. करगणीकर A. M. व कु. मधुकर ओतारी यांनीं पुस्तकासाठीं चित्रें काढून दिलीं त्याबद्दल त्यांचा आभारी आहें.

महाराष्ट्र ग्रंथ भांडाराचे चालक श्री. गो. वा. कुलकर्णी यांनीं हें पुस्तक प्रकाशित करण्याचें ठरवून मला उपकृत केलें आहे. माझ्याबद्दल त्यांना जो जिव्हाळा वाटतो त्याची परतफेड मी कशी करूं शकणार? त्यांचे माझे संबंध केवळ व्यवहारी नाहींत. हें पुस्तक प्रकाशित करून स्काउट चळवळीची सेवाच त्यांनीं केली आहे. त्यांच्या मुद्रणालयाचें नांव सार्थ आहे!

प्रकाशनाच्या कामीं सल्ला देणारे माझे स्नेही श्री. भ. रा. नाईक यांचाहि येथें उल्लेख करणें आवश्यक वाटतें.

स्काउट/गाईड क्षेत्रांतील सर्वांना माझी कृति आवडो एवढी इच्छा व्यक्त करून लांबलेलें प्रास्ताविक आवरतें घेतों.

—द्वा. वा. केळकर.

## अर्पणपत्रिका.

स्काउट/गाईड चळवळींचें शिक्षणमूल्य यथार्थ-
पणें करून उत्तर भारतामध्यें तिचें बीजारोपण
करणारे थोर शिक्षणतज्ज्ञ व देशसेवक
महामना कै० पं. मदनमोहन माळवीय—
यांच्या पवित्र स्मृतीस
ही अल्पशी कृति
अर्पण करीत
आहें.

—लेखक.



छोटा 'स्टे' (बेडन पॉवेल) व रस्किन

# छोटा ' स्टे '

लंडन शहरांतील स्टॅनहोप स्ट्रीटवरील एका घरामध्यें एक मुलगा चित्रें काढण्यामध्यें व्यग्र होऊन गेला होता. छोट्याशा फलकावर त्यानें कागद ठेवला होता व त्यावर डाव्या हातानें तो सफाईदार रेषा मारीत होता. चित्र हळूहळू आकार घेत होतें. जरा दूर अंतरावर उभें राहून एक प्रौढशी व्यक्ति त्या बालकाची हालचाल कुतूहलानें न्याहाळीत होती. या व्यक्तीला आणखी एक मौज पाहावयास मिळाली. त्या मुलाचा उजवा हातहि आतां काम करूं लागला होता. रंगपेटींतून दोन कुंचलें काढून त्या मुलानें दोन्ही हातांनीं चित्र रंगविण्यास सुरुवात केली. दोन्ही कुंचले सफाईदारपणें चित्रांत एकाच वेळीं रंग भरूं लागले. आतां मात्र दूरून निरीक्षण करणाऱ्या त्या गृहस्थांना राहवलें नाहीं.

'That's nice, my boy. Nice, indeed!' असे उद्गार काढून त्यांनीं त्या बालकाची अगदीं मन:पूर्वक पाठ थोपटली. इतकेंच नव्हे तर त्या मुलाच्या आईला त्यांनीं बाहेर बोलावून सांगितलें, ' ताई, तुला कल्पना तरी आहे का? तुझा मुलगा केवढा कलाकार आहे याची? दोन्ही हातानें आणि एकाच वेळीं काम करणें ही असामान्य गोष्ट आहे.'

आपली ही प्रशंसा ऐकून त्या बालकाला मिठाई चाखल्याचा आनंद होत होता.

वाचकहो, हा लहान मुलगा ' स्टे ' म्हणजे स्काउट चळवळीचे जनक म्हणून त्रिखंडांत गाजलेले लॉर्ड बेडन पॉवेल होत. आणि

दूर उभे राहून पाहाणारी ती व्यक्ति म्हणजे इंग्लंडचे श्रेष्ठ विचारवन्त प्रसिद्ध लेखक 'रस्किन' होत.

बेडन पॉवेल यांचें लहानपणचें नांव 'स्टे' होतें याचा उल्लेख वर आला आहेच. त्यांचा जन्म २२ फेब्रुवारी १८५७ रोजीं लंडन शहराच्या हाईड पार्क भागांत एका खानदानी घराण्यांत झाला. त्यांचे वडील रेव्हरंड बेडन पॉवेल हे ऑक्सफोर्ड विद्यापीठाचे विद्वान् प्रोफेसर होते; शिवाय चर्चचे प्रमुख अधिकारी होते. 'स्टे'च्या आई या इंग्लंडचे प्रख्यात ॲडमिरल स्मिथ यांच्या सुकन्या होत्या. प्रसिद्ध ज्योतिर्विद् पियाझी स्मिथ हे 'स्टे'चे मामा होते. आणि आपल्या शोधामुळें जगाला नवीन वळण देणारे वाष्पयंत्राचे संशोधक रॉबर्ट स्टिफन्सन यांचाहि 'स्टे'च्या घराण्याशीं संबंध होता. तेव्हां अशा थोर घराण्यांत जन्म घेऊन 'स्टे'नें कांहीं थोडी आनुवंशिक संपत्ति मिळविली नव्हती. 'स्टे'चें पाळण्यांतील नांव 'रॉबर्ट स्टीफन्सन स्मिथ बेडन पॉवेल' इतकें मोठें नांव कोणाला झेंपणार, म्हणून 'स्टे' ह्या एकाक्षरी नांवानेंच सर्वजण संबोधूं लागले.

आपल्या दहा भावंडांतील 'स्टे'चा आठवा क्रमांक होता. ॲग्नेस नांवाची एक बहीणहि स्टेला होती. हीं सर्वच भावंडें समंजस असल्यामुळें स्टेचें घर म्हणजे आनंदानें भरलेलें गोकुळच म्हणा ना !

आपल्या सर्वच मुलांमध्यें समंजसपणा व चौकसवृत्ति हे सद्गुण आहेत हें पाहून प्रो. बेडन पॉवेल यांना अत्यानंद होत असे. आपल्या मुलांना बरोबर घेऊन लांब लांब सहली करण्याचा एक छंदच त्यांना होता. तऱ्हेतऱ्हेचे पशु-पक्षी आणि फुलें याबद्दल

क्रमांक ........ नों: दि: ......

अगदीं तन्मयतेनें ते माहिती सांगत. अत्यंत प्रेमळ आणि आनंदी अशा मातापित्यांच्या छत्राखालीं चिमुकल्या 'स्टे'चें बालपण जाणार होतें. पण....

'स्टे' केवळ तीन वर्षांचा असतांना त्याचे वडील ख्रिस्तवासी झाले. त्यामुळें 'स्टे'च्या मातुश्री हेन्रीएटा यांच्यावर दुःखाचा डोंगरच कोसळला. पण त्याखालीं आपलीं अजाण मुलें चिरडून जाऊं नयेत याची काळजी घेण्याइतक्या हेन्रीएटा या बुद्धिमान आणि धीराच्या होत्या. आपलें दुःख त्यांनीं हृदयांत कोंडून ठेवलें आणि आपल्या कुटुंबाच्या आर्थिक स्थितीचा व वार्षिक उत्पन्नाचा विचार करून त्यांनीं पुढील आयुष्याचा मार्ग ठरविला. इतक्या मुलांचें शिक्षण व अन्नवस्त्र यांचा खर्च झेपण्यासाठीं थोडीशी काटकसर करणें त्यांना भागच होतें.

'स्टे'ची आणखी एक आवडती व्यक्ति म्हणजे त्याचे म्हातारे आजोबा 'अॅडमिरल स्मिथ.' या म्हाताऱ्याचें सर्व आयुष्य सागरावर मुशाफरी करण्यांत गेलें. आणि म्हणूनच वर्मिंगहॅम शायरमधील आपल्या बंगल्यासमोर जी बाग होती तिला त्यांनीं 'क्वार्टर डेक' असें सागरपर्यटनाची आठवण ताजी ठेवणारें नांव दिलें होतें. आपल्या सागरी जीवनांतील अनेक धाडशी सफरींचे अनुभव ते तिखटमीठ लावून सांगत आणि त्या गोष्टी 'स्टे' अगदीं कान टवकारून ऐकत असे. पहिल्या एलिझाबेथ राणीच्या कारकीर्दींत अमेरिकेच्या नव्या जगामध्यें व्हर्जिनिया ही वसाहत स्थापन करणाऱ्या कॅ. स्मिथच्या गोष्टीहि ते सांगत. आणि त्या गोष्टी

ऐकून मग ‘ स्टे ’ आपल्या आईपाशीं येई आणि ऐकलेल्या सर्व गोष्टी पुन्हा आईला सांगे.

लंडन शहराशेजारींच ‘ इपिंग व हॅडले ’ या नांवाचीं घनदाट अरण्यें त्या वेळीं होतीं. घोडागाडींत बसून तेथवर जाऊन त्या अरण्यांत मनसोक्त भटकण्याचा ‘ स्टे ’ व त्याचीं भावंडें यांचा आवडता छंद होता. ‘ सर्पिन टाईन ’ नांवाचें एक लहानसें तळें तेथें होतें. त्याच तळ्यांत सर्वजण पोहावयास शिकले. कागदी नावांना शिडें लावून तळ्यांत सोडून त्यांचा खेळ पाहाण्यांत किंवा मासे पकडण्यासाठीं गळ लावून बसण्यांत ‘ स्टे ’चा कितीतरी वेळ जात असे; पण त्याची आई त्याबद्दल त्याला किंवा इतर मुलांना कधीं टाकून बोलत नसे. रागावणें ही गोष्टच तिला माहीत नसावी. मात्र मुलांची निरीक्षणशक्ति वाढावी आणि स्वावलंबनाचे धडे त्यांनीं अगदीं बालपणापासूनच गिरवावे याबद्दल तिचा नेहमींच कटाक्ष होता व त्यासाठीं ती अत्यंत सफाईनें सहजतेनें प्रयत्न करी. दारावरून जाणारे फेरीवाले, माळी वगैरेंच्या हुबेहूब नकला ‘ स्टे ’ करीत असे, त्या वेळीं त्याला शाबासकी देऊन हेन्रीएटा म्हणत, ‘ स्टे, पहा बरं, तुला फेरीवाल्यासारखा पोशाख करता येतो का ? तसा पोशाख करून मग पुन्हा नक्कल करून दाखव पाहूं.’ अशा प्रकारें जातां जातां मार्गदर्शन करण्याची कला त्यांच्यापाशीं होती. त्यामुळें आई म्हणजे आपली एक मोठी प्रेमळ मैत्रीण आहे अशी भावना स्टेच्या मनांत दृढ झाली. आपल्या मोठेपणीं त्यांनीं आईबद्दल आपली भावना खालील शब्दांत व्यक्त केली आहे–

'मी लहान असतां तिनें मला सुशिक्षण दिलें आणि तरुण झाल्यावर मीं क्रमाक्रमानें ज्या गोष्टी केल्या त्यांचें सहानुभूतीनें परिशीलन केलें. प्रथमच 'स्काउट' चळवळ सुरू करतांना मला भीति वाटली होती कीं आपण हें कार्य करीत आहोंत यांत कांहीं तथ्य आहे किंवा कसें? पण माझ्या आईनें सांगितलें कीं, तूं जर केवळ याच कार्यास चिकटून राहिलास तर हजारों मुलांचें त्यामुळें कल्याण होईल.'—

म्हणजेच पर्यायानें बी. पी. यांच्या आईलाच स्काऊट चळवळीच्या संस्थापनेचें श्रेय द्यावयास हवें.

'लहानसहान गोष्टीकडेहि बारकाईनें पाहाण्याची आणि त्यापासून बोध घेण्याची संवय बालपणीं माझ्या आईनेंच मला लाविली. यालाच 'निरीक्षण' आणि 'अनुमान' हें दुसरें नांव आहे.'

लहानपणीं बागकाम करण्याची 'स्टे'ला फार आवड होती; त्याचप्रमाणें लाकडावर खोदकाम करण्यामध्येंहि त्याचा बराच वेळ जात असे. पण या सर्वांपेक्षां महत्त्वाची अशी एक असामान्य गोष्ट 'स्टे'च्या वर्तनामध्यें अगदीं लहानपणापासून दिसून येते. ती म्हणजे गरीबांच्याबद्दल अपार सहानुभूति आणि परमेश्वरावर अढळ विश्वास. १८६५ सालीं 'स्टे'चा आठवा वाढदिवस मोठ्या आनंदानें साजरा झाला. त्या दिवशीं या गोड मुलानें आपल्या छोट्याशा डायरीमध्यें काय लिहून ठेवलें आहे तें पहा.

## मोठेपणीं मी पाळावयाचे ते नियम.

गरीब लोकांना आमच्याइतकें सुख मिळण्याचा अधिकार आहे म्हणून त्यांना आमच्याएवढे श्रीमंत मी करीन.

रस्त्यावर झाडू मारणारे जे लोक असतात त्यांना येणाऱ्या जाणाऱ्या सर्व लोकांनीं पैसे दिलेच पाहिजेत.

देवानें आपणांस इतकें श्रीमंत केलें म्हणून त्याची प्रार्थना आपण केलीच पाहिजे; आणि फक्त एवढें करून काम भागणार नाहीं. आपण सर्वांशीं चांगलें वागलें पाहिजे.

दिनांक २६ फेब्रु. १८६५

ॲडमिरलनीं हें पान वाचून पाहिलें. 'स्टे' च्या बालमनांत चाललेल्या विचारतरंगांची त्यांना त्यामुळें खूपच माहिती मिळाली. 'आर्थिक समानता' हें तत्त्व ॲडमिरलना मान्य नव्हतें; तरीसुद्धां एकंदर मजकूर वाचून व तो आपल्या छोट्या नातवंडानें लिहिला आहे हें पाहून, त्यांच्या डोळ्याच्या कडा ओल्या झाल्या. आठ वर्षांचीं मुलें किती हूड असतात ! त्याच वयांत आपल्या मोडक्या-तोडक्या भाषेंत 'स्टे'नें जो मजकूर लिहिला त्यावरूनच त्या मुलाच्या असामान्य सद्गुणांबद्दल आपणांसहि कल्पना येते. छोट्याशा बीजापासूनच महान् वृक्ष होतो. भावी आयुष्यांत 'स्टे'नें ज्या प्रचंड कार्यास हात घातला त्याचीं बीजें त्याच्या बाल्यावस्थेंतहि आपणांस दिसून येतात.

# 'बी. पी.' चें शालेय जीवन

दिवस भराभर निघून जात होते. 'स्टे' चा बाल्यावस्थेंतील काळ मोठ्या आनंदांत चालला होता. टर्न-ब्रिज् वेल्समधील एका प्राथमिक शाळेंत तो जात असे; त्या शाळेचें नांव 'रोज़्हिल् स्कूल'.

'स्टे' तेरा वर्षांचा असतांना अभ्यासांतील प्राविण्यानें त्याला दोन शिष्यवृत्ती (स्कॉलरशिप्स) मिळवून दिल्या; त्यांतील एक स्कॉटलंडमधील एका शाळेची व दुसरी 'चार्टर हाऊस' या एका जुन्या व ख्यातनाम शाळेची होती. ज्या शाळेची शिष्यवृत्ति स्वीकारावयाची तेथें जाणें आवश्यक होतें; अर्थात् 'चार्टर हाऊस' मध्यें 'स्टे' ला पाठवावयाचें ठरलें. आपली जुनी शाळा सोडून 'स्टे' दुसऱ्या शाळेंत जाण्यासाठीं दाखला मागावयास आला तेव्हां 'रोज़्हिल्' च्या प्रमुख अध्यापकांनाहि वाईट वाटलें. वास्तविक 'स्टे' इतर विद्यार्थ्यांप्रमाणेंच त्या शाळेंतून पुढें चालला होता, पण शिक्षकांच्या मनावर आपल्यासंबंधीं अशा कांहीं गोड आठवणी मागें ठेवून तो जात होता कीं त्यांनाहि वाईट वाटावें! १८७० मध्यें 'स्टे' नें चार्टर हाऊसमध्यें प्रवेश केला.

विशिष्ट ध्येय समोर ठेवून सातत्यानें कार्य करणाऱ्या संस्थांना नदीच्या पात्राची उपमा दिली जाते. पाण्याचा प्रवाह सतत सुरू असतो, पण पात्र एकाच ठिकाणीं असतें. त्याचप्रमाणें संस्थांमधील कार्यकर्ते बदलतात, पण संस्था कायम असते. 'चार्टर हाऊस' ही अशाच प्रकारची एक फार जुनी संस्था आहे. या शाळेची स्थापना होऊन दीडहजार वर्षे झालीं आहेत!

डॉ. हेग हे अत्यंत विद्वान् गृहस्थ या शाळेचे प्रमुख होते. त्यांचा स्वभाव थोडासा विनोदीहि होता. भुरकट सोनेरी केसांच्या आणि रुबाबदार पोषाखांत वावरणाऱ्या 'स्टे'नें त्यांचें लक्ष चांगलेंच वेधून घेतलें. लवकरच 'स्टे' विद्यार्थ्यांचा म्होरक्याहि झाला.

चार्टर हाऊस शाळेच्या नजीकच एक खाटीकखाना होता. लंडन शहराची वाढहि शाळेच्या भागाकडे अधिकच झाली होती. कितीतरी नवीन नवीन इमारती तेथें झाल्या होत्या. म्हणून शाळेच्या चालकांनीं लवकरच दुसऱ्या एका ठिकाणीं शाळेचा सर्व व्याप हालवून नेण्याचें ठरविलें.

पण या जुन्या जागेंत असतांना घडलेली एक घटना 'स्टे'च्या पुढील कार्याचे दृष्टीनें महत्त्वाची असून तिचा उल्लेख येथें करणें अवश्य वाटतें.

स्मिथफील्ड् मटन-मार्केटमधील खाटिकांचीं कांहीं मुलें आणि चार्टरहाऊसमधील विद्यार्थी यांच्यामध्यें कांहीं कारणानें मोठीच तेढ निर्माण झाली होती. एक दिवस तर त्या व्रात्य मुलांनीं शाळेवरच जोराची दगडफेक केली. प्रिन्सिपॉल डॉ. हेग त्या वेळीं तेथें होते. शाळेमध्यें आसऱ्यासाठीं उभे असलेल्या विद्यार्थ्यांकडे त्यांची नजर गेली. विद्यार्थ्यांनीं प्रसंगीं झगडा करण्यास मागेंपुढें पाहूं नये असें डॉक्टरसाहेबांना वाटत असावें. ते म्हणाले, 'अरे, या शत्रूवर पिछाडीच्या बाजूनें तुम्ही हल्ला कां नाहीं चढवीत?'

'शाळेच्या मागील दाराला कुलूप आहे सर!' कोणी तरी उत्तरलें.

'ही घ्या त्याची किल्ली. जा मागच्या बाजूनें आणि आणा पकडून त्या मुलांना.'

थोड्याच वेळांत चार्टर हाऊसच्या वानरसेनेला यश आलें. या छोट्याशा घटनेपासून 'स्टे' नीं खूपच बोध घेतला. मोठेपणीं या प्रसंगाची ते आठवण काढीत आणि म्हणत—'माझ्या आयुष्यांतील गनिमी-काव्याची तीच पहिली लढाई !'

पुढें थोड्याच दिवसांत चार्टर हाऊस शाळा 'गोडालमिंग' विभागामध्यें चांगल्या इमारतीमध्यें नेण्यांत आली. त्या वेळीं सामान-सुमान हालवितांना 'स्टे'नें अपार श्रम केले.

स्टे आतां पंधरा वर्षांचा झाला होता. हळूहळू त्याचा स्वभाव बदलत जात होता. तसेंच अभ्यासाकडेहि त्याचें लक्ष अधिकाधिक लागूं लागलें. त्याप्रमाणें त्याचें रूढ नांवहि बदलूं लागलें. नांवाच्या आद्याक्षरांवरून त्याला 'बी. पी' ह्या नांवानें संबोधण्यांत येऊं लागलें. इतिहास या विषयासंबंधीची आवड जशी जशी अधिक वाढूं लागली तसतसा शाळेच्या ग्रंथालयामध्यें जाऊन एकाग्र चित्तानें वाचन करण्याचा 'बी. पी.'चा नाद वाढूं लागला.

एकदां शाळेमध्यें करमणुकीचे कार्यक्रम होणार होते; पण ठरल्या वेळीं कार्यक्रम सुरु होण्याचें कांहींच चिन्ह दिसेना. तेव्हां दरम्यानच्या वेळामध्यें कांहीं मनरंजन करावें म्हणून शिक्षकांनीं बी. पी. ला सहज सुचविलें. त्या वेळीं 'फ्रेंच' शिकविणाऱ्या अध्यापकांची नक्कल त्यानें इतकी सुंदर वठविली कीं हसतां हसतां पुरेवाट होऊन गेली.

बी. पीं. चा सभाधीटपणाबद्दल आत्मविश्वास हळूहळूं वाढूं लागला आणि त्यांचें स्टेजवरील कामहि सहजसुंदर असें वठूं

लागलें. ज्या शिक्षकांनीं त्यांना स्टेजवर चढण्याची प्रथम संधी दिली त्यांचा मोठ्या कृतज्ञतेनें 'बी. पी' उल्लेख करीत असत. भावी आयुष्यामध्यें ज्या गुणांमुळें बी. पीं. ना विलक्षण लोकप्रियता लाभली त्यांमध्यें अभिनयकलेचाहि महत्त्वाचा भाग आहे.

## शाळेची नवी इमारत–

नव्या शाळेची इमारत एका टेकडीवर होती, आणि जवळच 'कोप्स' नांवाचें राखीव जंगल होतें. शहरानजीक अशा प्रकारचीं जंगलें मुद्दाम राखून ठेवण्याची पद्धत इंग्लंडमध्यें पुरातन काळापासून आहे. बी. पीं.ना एकान्तवासाची मनापासून आवड. संधी मिळेल त्या वेळीं अध्यापकांची नजर चुकवून स्वारी या जंगलामध्यें फेर-फटका करून येत असे; एवढेंच नव्हे तर त्या जंगलामध्यें बी. पीं. नीं पाकशास्त्राचे कांहीं प्रयोग करून व स्वहस्तें शिजवून कांहीं पदार्थ करून खाल्लेसुद्धां होते. अमेरिकेंत वसाहत करणाऱ्या कॅप्टन स्मिथची त्या वेळीं बी. पीं. ना आठवण होत असे. 'रेड इंडियन' लोकांच्या नजरेला न पडतां स्मिथला अमेरिकेमध्यें प्रथम राहावें लागलें. त्याप्रमाणें अध्यापकांच्या टेहळणीमधून बी. पी.नीं लहानपणीं अशी छोटी वसाहत केली होती! स्काऊटिंगच्या परीक्षामध्यें वननिवास व स्वहस्तें स्वयंपाक याला जें महत्त्व आहे, त्याचें मूळ बी. पीं.च्या बालपणींच्या या आनंददायी अनुभवांमध्यें आहे.

पत्र-लेखनाची आवड पहिल्यापासून 'बी. पीं'ना अतिशय होती. शाळेमध्यें एक छोटें वृत्तपत्र निघत असे, त्यामध्यें प्रसिद्धीसाठीं 'पत्ररूपानें' कांहीं मजकूर ते लिहून देत असत. त्यांच्या या

सरावामुळें त्यांच्या सर्वच लेखनाची धाटणी खेळीमेळीची आणि खास ढंगदार झाली आहे.

फुटबॉल हा ‘बी. पीं’चा आवडता खेळ. ‘गोल-कीपरचें’ काम नेहमीं त्यांच्याकडे असावयाचें. त्यांचे अंगविक्षेप व आरोळ्या यांचेमुळें बालप्रेक्षकांची ते खूपच करमणूक करीत. त्यांच्या अशा विविध क्लृप्त्यामुळें एकदां तर इतर खेळाडू इतके बेसावध राहिले कीं ‘बी. पीं’नीं चेंडूला ‘किक्’ केव्हां दिली आणि ‘गोल’मधून तो कसा गेला हें विरुद्ध पक्षाच्या खेळाडूंना समजलेंहि नाहीं. तेव्हां त्यांचा कॅप्टन म्हणतो कसा, ‘त्यांत काय झालं एवढं? आमचा गोलकीपर सावध नव्हता म्हणून असं घडलं.’ सर्वजण खोः खोः हंसूं लागले.

‘चार्टर हाउस’ मधील शेवटचीं २–३ वर्षें ‘बी. पी.’च्या दृष्टीनें विशेषच सुखाचीं गेलीं. शाळेच्या ‘क्रीडासमिती’ आणि ‘गृहसमिती’चे ते सभासद होते. शाळेच्या स्वयंसेवक पथकामध्यें त्यांचें नेमबाजीचें आणि बिगुलरचें शिक्षणहि झालें. अचूक नेमबाजी करणाऱ्या आपल्या सहा सवंगड्यांसह त्या वेळीं काढला गेलेला बीं. पींचा एक फोटो पाहावयास मिळतो.

१८७६ मध्यें बी. पी. ‘Sixth Form’ मध्यें असल्यामुळें शाळेंतील त्यांचें तें शेवटचें वर्ष होतें. त्या वेळीं ते वर्गचिटणीस होते. वर्षभर सर्व विद्यार्थ्यांशीं त्यांचा सतत संबंध आला. मनमिळाऊ स्वभावामुळें वर्गाच्या वातावरणामध्यें ते इतके रमले होते कीं वर्ष संपतांना त्यांना गहिंवरून आलें. त्यांच्या दीर्घायुष्यामध्यें त्यांनीं आपल्या या पूर्वायुष्यांतील स्मृतींची किती वेळां तरी उजळणी केली

आहे. शाळेचे आपण आजन्म ऋणी आहोंत, अशी भावना त्यांच्या मनामध्यें सतत जागृत होती.

शाळेंतील शिक्षण संपल्यावर जॉन आणि फ्रँक या आपल्या बंधूप्रमाणें 'बी. पीं.'नींहि ऑक्स्फोर्ड विद्यालयांत जावें असें घाटत होतें. पण पदवी परीक्षेचें फारसें आकर्षण 'बी. पीं.'ना नव्हतें. आणि दुसरी एक गोष्ट म्हणजे त्यांचे थोरले बंधू वॉरिंग्टन यांची बी. पीं. नीं लष्करामध्यें सामील व्हावें अशी इच्छा होती. त्यांनीं बी. पीं. ना सल्ला दिला कीं, 'तुला जर प्रवास आणि धाडसी जीवन यांचें आकर्षण आहे तर तूं सैन्यामध्यें कां शिरत नाहींस? सैन्याधिकाऱ्यांसाठीं असलेल्या परीक्षेंत तूं नक्की उत्तीर्ण होशील.'

'बी. पीं.' ना हा मार्ग बरा वाटला आणि त्यामुळें या चांचणी परीक्षेला बसावयाचें त्यांनीं ठरविलें. युक्लीडचीं अवघडांत अवघड प्रमेयें तेथें विचारलीं जातात, असें समजल्यावर, 'बी. पीं' ना जरी भूमिति हा विषय फारसा आवडत नव्हता तरी, त्या विषयाचा कसून अभ्यास करावयाचें त्यांनीं ठरविलें.

परीक्षेमध्यें 'बी. पीं.' नीं तर्क केल्याप्रमाणें बरेच प्रश्न विचारले गेले आणि त्यांचीं अगदीं समाधानकारक उत्तरेंहि ते देऊं शकले. परीक्षा संपतांच 'बी. पीं.' ना अगदीं हायसें वाटलें. आणि आपल्या मित्रांसह चार दिवस नावेमधून सहलीसाठीं ते रवाना झाले.

ज्या ठिकाणीं त्यांचा मुक्काम होता त्या गांवीं 'रॉबर्ट बेडन पॉवेल' या उमेदवाराचें 'आर्मी कमिशन' च्या परीक्षेमध्यें सुयश मिळविल्याबद्दल अभिनंदन करणारें वृत्तपत्र बी. पीं. च्या अवलोकनांत

आलें. ती आनंदाची बातमी समजतांच ‘ बी. पी. ’ अर्थातच तडक घरीं परतले. तों तेथें त्यांना अधिकच आनंदाची बातमी समजली कीं, सँडहर्स्टच्या मिलिटरी ट्रेनिंग कॉलेजमधील सक्तीचा शिक्षणक्रम त्यांना माफ करण्यांत आला होता; आणि १३ व्या ‘ हुझार ’ पलटणीमध्यें ‘ सेकंड लेफ्टनंट ’ म्हणून त्यांची नियुक्तीहि करण्यांत आली होती!

ही पलटण हिंदुस्थानमध्यें कामगिरीवर असल्यानें ‘बी. पीं.’ नाहि मोठ्या जलपर्यटनासाठीं कंबर कसणें भाग पडलें; आणि येथपासून त्यांच्या जीवनाला निराळें वळण लागलें.

# हुझार पलटणीचें नेतृत्व

आपला लाडका रॉबर्ट वीस वर्षांचा झाला नाहीं तोंच परदेशीं जाणार म्हणून ‘ बी. पी ’ यांच्या आई हेन्रीएटा यांना काय वाटलें असेल बरें ? कॉलेजच्या शिक्षणासाठीं मुलगा परगांवीं चालला तरी सुद्धां आईला त्याची काळजी वाटते; आणि ‘ बी. पी. ’ तर लष्करी कामगिरीवर चालले होते. आणि ते कोठें ? तर ज्या ठिकाणीं १८५७ सालीं, म्हणजे केवळ वीस वर्षांपूर्वीं ब्रिटिश सत्ता उखडून टाकण्यासाठीं महाभयंकर युद्ध झालें त्या हिंदुस्तानमध्यें ! त्यापेक्षां ‘ नको ती नोकरी आणि तो साम्राज्याचा अभिमान ! ’ असें त्या मातृहृदयाला वाटलें असेल. आईचें हृदय कोणत्याहि काळांत व कोणत्याहि देशांत एकच असणार. आईच्या मनःस्थितीचें वर्णन ‘ बाळ जातो दूर देशीं....... ’ या काव्यामध्यें अप्रतिम गायिलें आहे. असो.

प्रवासाच्या तयारीसाठीं ‘ बी. पीं.’ना दीड महिन्याचा अवधि देण्यांत आला. सर्व वस्तूंची खरेदी, कपडे शिवून आणणें यासाठीं आणि आप्तांच्या भेटीगांठी यासाठीं तो काळ आवश्यकच होता. आई आणि भावंडें यांचा निरोप व त्याप्रमाणेंच जिवलग मित्र आणि डॉ. हेग ब्राऊन यांचा प्रेमळ निरोप घेऊन दिनांक ३० ऑक्टोबर १८७६ ला ‘ Serapis ’ या जहाजावरून हिंदुस्तानला येण्यासाठीं ‘ बी. पी. ’ निघाले. येवढ्या मोठ्या जहाजावर ते प्रथमच चढत होते. ते अधिकारी म्हणून जात असल्यामुळें त्यांच्यासाठीं सर्व प्रकारच्या सुखसोयी तेथें होत्या. प्रवास सुरू झाला.

तिसऱ्या वर्गानें जे प्रवासी चालले होते त्यांपैकीं कांहीं वाटेंत प्रवासाच्या दगदगीमुळें आजारी पडले. बी. पी. आणि त्यांच्या-सारखेच दुसरे एक तरुण अधिकारी नीथ मेक्लेस् या दोघांनीं आपल्या आजारी सहप्रवाशांना सर्वप्रकारें मदत केली. दुसऱ्याच्या सुखासाठीं सदैव कष्ट करण्यास त्यांची पहिल्यापासून तयारी दिसून येते.

जीवन सुसह्य होण्यास विनोदी स्वभाव व संगीतासारख्या कला यांची फार मदत होते. 'बी. पीं.'नीं आपल्या आनंदी स्वभावानें जहाजावरील सर्व दर्जाच्या लोकांचे चेहऱ्यावर स्मिताची रेषा उमटविली. जहाजावर करमणुकीचे कार्यक्रम योजण्यांत आले; नाट्य-संगीताचे कार्यक्रमहि होऊं लागले. आणि प्रवास सुखकर होऊं लागला. आपल्या या प्रवासाचें साद्यंत वर्णन आपल्या "Indian Memories" या पुस्तकामध्यें 'बी. पीं.' नीं उत्तम करून ठेवलें आहे. या काळामध्यें आईला त्यांनीं जीं पत्रें लिहिलीं तीं पत्रवाङ्मयाचा उत्तम नमुना ठरतील. 'पोर्ट सैद' येथील हमालांचे, कोळसे भरणाऱ्या कामगारांचें, सुवेझ कालव्यांतून जातांना 'ओकाती' नांवाचा एक मनुष्य यंत्रानें पाणी शिंदून काढीत होता त्या दृश्याचें सुंदर वर्णन पत्रांमध्यें आलें आहे. एके दिवशीं आकाशमार्गे लांब लांब पायाचे आणि लाल लाल चोचींचे पक्षी चालले होते तें दृश्य पाहून 'बी. पीं.'च्यांतील सुप्त चित्रकार जागा झाला, त्यांनीं आपली रंग-कुंचली सरसाविली आणि त्या पक्ष्यांचीं चित्रें चितारलीं. जहाजावरील अनेक प्रवाशांचीं व्यंगचित्रेंहि त्यांनीं काढलीं. तीं चित्रें म्हणजे एक कौतुकाचा व करमणुकीचा विषय जहाजावर झाला असल्यास नवल नाहीं.

तांबड्या समुद्रांतील कंटाळवाणा प्रवास व हिंदी समुद्रांतील उष्ण व दमट हवेंतील प्रवास एकदांचा संपून ६ डिसेंबरला जहाज मुंबई बंदराला लागलें. पण 'बी. पीं.'चा प्रवास अजून पुरा व्हावयाचा होता. लखनौ या ठिकाणापासून कांहीं अंतरावर त्यांची १३ वी हुझार पलटण होती. मुंबई ते लखनौ हा प्रवासहि मोठा लांबलचक व कंटाळवाणा आहे. आणि तेथून पुढचा प्रवास तर बैलगाडीनें करावयाचा होता; पण 'बी. पीं.'ना त्याचें कांहींच वाटलें नाहीं. त्रास व हालअपेष्टा यामध्येंहि एक प्रकारची मौज आहे, व त्यामध्येंहि जीवन आहे, असें त्यांना वाटे. बैलगाडींतून जातांना निसर्गसौंदर्य अधिक जवळून पाहातां येतें. 'बी. पीं.' ची अशी दृष्टि होती.

अशा प्रकारच्या उत्साही अधिकाऱ्याचें स्वागत करतांना हुझार पलटणीला फार आनंद वाटला. ज्या बंगल्यामध्यें 'बी. पीं.' चें वसतिस्थान होतें त्याच्या पुढील बाजूस मोठी बाग होती याबद्दल त्यांना अत्यंत आनंद वाटला. थोड्याच दिवसांमध्यें हिंदुस्थानच्या वातावरणाशीं ते समरस झाले. शेजारीं राहणाऱ्या एका अधिकाऱ्याचीं दोन छोटींशीं मुलें त्यांच्याकडे येत; त्या मुलांना 'बी.पी.' जणूं खेळगडीच आहेत असें वाटे. आपलें नांव 'चार्ली' आहे असें त्या मुलांना 'बी. पी.' नीं सांगितलें होतें. चित्रें काढणारा हा चार्लीकाका मुलांना खूपच आवडला. या मुलांमार्फत त्यांच्या घरींहि अगदीं सहजपणें बी. पीं. च्या ओळखी झाल्या

लष्करी अधिकारी सामान्यपणें बेसुमार खर्चिक असतात. दारू व सिगारेट यांमध्यें त्यांच्या पैशाचा किती तरी व्यय होत असतो.

'बी. पीं'ना या गोष्टी रुचत नसत. खर्चाची व जमेची तशी काळजी करण्यासारखी त्यांची परिस्थिति नव्हती, तरी काटकसर व पैशाचा योग्य त्या कामीं विनियोग याबद्दल त्यांचे विचार इतरांना धडा घालून देण्यासारखे होते. दारू आणि तशींच भारी किंमतीचीं पेयें यांच्याऐवजीं फळफळावळ आणि केक्स यावर ते खर्च करीत. इतर अधिकारी, अगोदर शिकवून तयार केलेले घोडे विकत घेत, पण 'बी. पीं'नीं दोन चांगलेसे घोडे निवडले व त्यांना स्वतःच 'Training' दिलें. यामुळें त्यांचा पैसा तर खूप वांचलाच, पण एका महत्त्वपूर्ण कलेचें शिक्षणहि त्यांना मिळालें. फावल्या वेळामध्यें 'डेलि ग्राफिक'ला ते मजकूर लिहून प्रकाशनासाठीं पाठवीत असत. यामुळें त्यांचा रिकामा वेळ तर सत्कारणीं लागत असेच, पण थोडीशी आर्थिक प्राप्ति पण होई. वेळाचा व धनाचा विनियोग चांगल्या रीतीनें कसा करावा हें आपणांस त्यांच्या या उदाहरणावरून समजूं शकेल.

मिलिटरीच्या दृष्टीनें 'बी. पीं.'चें शिक्षण अपुरें झालें होतें; त्यामुळें त्यांना इतर कांहीं परीक्षा द्याव्या लागल्या. लष्करी नकाशे तयार करणें, युद्धक्षेत्राची पाहाणी करणें व घोडदौड या विषयांचा अभ्यास त्यांनीं केला व त्या परीक्षांमध्यें सुयशहि मिळविलें. या सगळ्या गोष्टी हिंदुस्थानमध्यें आल्यानंतर दीड वर्षाच्या अवधींतच त्यांनीं केल्या. १८७८ मध्यें डिसेंबर महिन्यांत विश्रांतीसाठीं रजा घेऊन ते स्वदेशीं जाण्यासाठीं निघाले.

प्रवासामध्यें जहाजावर त्यांना एक प्रकारें शारीरिक विश्रांतीच मिळाली. इंग्लंडमध्यें परतल्यावर त्यांच्या आईला त्यांना पाहून

प्रेमाचें भरतें आलें. आप्तेष्टांना व मित्रांना हिंदुस्तानबद्दल फार कुतूहल वाटत असे, त्यामुळें त्यांच्यावर प्रश्नांचा भडिमार होई. विनोदी पद्धतीनें त्यांचीं उत्तरें देऊन 'बी. पी.' खूपच मनोरंजन करीत. इंग्लंडमध्यें जाण्याचा त्यांना आणखी एक लाभ झाला. 'बी. पीं.'ना नेमबाजीचें शिक्षण घ्यावयाचें होतें. तो कोर्स त्यांनीं तेथें पुरा केला. त्यासाठीं त्यांना थोडीशी रजासुद्धां वाढवून घ्यावी लागली.

रजेची मुदत *संपल्यावर भारताच्या* वायव्य सरहद्दीवरील 'कोकोरान' या ठिकाणीं 'बी. पीं.'ची नेमणूक झाली. या ठिकाणीं परिस्थिति नेहमींच तंग असे. आडदांड व लढाऊ अफगाण लोकांशीं तेथें गांठ होती. फार पुरातन काळापासून हिंदुस्तानला या लोकांपासून त्रास सहन करावा लागत होता. हिंदुस्तानवर तो देश समृद्ध असल्यानें वारंवार या लोकांनीं हल्ले केले आहेत. ब्रिटिश अमदानीमध्येंसुद्धां हे हल्लेखोर हिंदुस्तानमध्यें घुसून ब्रिटिशांच्या कत्तली करीत असत. १८४१–४२ मध्यें लॉर्ड ऑक्लंड हे गव्हर्नर-जनरल असतांना अशाच प्रकारें हजारों इंग्रजांची कत्तल झाली. केवळ डॉ. ब्रायडन ही व्यक्ति कत्तलीची हकिगत सांगण्यापुरती तरी जलालाबादेस पोहोंचूं शकली. पुढें १८७९ सालीं अफगाण–ब्रिटिश यांचें दुसरें युद्ध झालें. लॉर्ड रॉबर्टस् यानें कसा-बसा बंदोबस्त करण्यांत यश मिळविलें. हा इतिहास अगदीं ताजा असल्यामुळें 'बी. पीं.'नीं आपल्या सैन्यास गाफील कधींच राहूं दिलें नाहीं.

'केवळ आज्ञापालन हेंच सैनिकांचें कर्तव्य असतें, बुद्धीला तेथें वाव नसतो; आणि सैनिकाला सतत कार्यमग्न ठेवून त्याच्या स्वभावाची घडण ठराविक विशिष्ट प्रकारची बनविण्याचा अधिकारी-वर्गाचा प्रयत्न सुरू असतो.' 'बी. पीं.' चे या संबंधींचे विचार जरा वेगळे होते. आज्ञापालन हें तर केलेंच पाहिजे, पण त्याच्या कक्षेंत राहूनहि स्वतंत्र बुद्धि वापरतां येते; 'यश' हें साध्य असल्यास अशा प्रकारच्या बुद्धीचा उपयोग करण्यास हरकत असूं नये; प्राण पणाला लावून लढणाऱ्या सैनिकाला थोडेंहि बुद्धिस्वातंत्र्य नसणें हा त्याच्या कर्तृत्वाचा अपमान होय, असें 'बी. पीं.' चें व्यक्तिगत मत होतें. तसेंच पट्टा व पितळी बटणें यांना पॉलिश करण्यामध्यें सैनिकांचा प्रमाणाबाहेर वेळ जात असतो, हें त्यांचें दुसरें महत्त्वाचें निरीक्षण होतें.

बी. पीं. चे विचार प्रगतिशील असल्यामुळें कर्नल सर बेकर रसेल यांना ते पटत असत.

अत्यंत डोंगराळ व अवघड प्रदेशाचे सुंदर नकाशे 'बी. पीं.'नीं तयार केले होते. १८८१ मध्यें त्यांच्या पथकाला कंदाहार येथें जाण्याची आज्ञा मिळाली. तेव्हां या नकाशांचा उपयोग करून 'बी. पीं.'नीं नजीकचा असा मार्ग शोधून काढला. त्यामुळें या प्रवासाचा वेळ दोन तासांनीं वांचला. सर्व सैनिकांनीं 'बी. पीं.'ना धन्यवाद दिले. कंदाहारास असतांना 'बी. पीं.'नीं मुख्यतः आपला चित्रकलेचा व्यासंग वाढविला. या कालांत त्यांनीं काढलेलीं चित्रें इंग्लंडमधील वृत्तपत्रां-तून प्रसिद्धहि झालीं होतीं.

१८८२ मध्यें त्यांची बदली मदुरा येथें झाली. तेथें त्यांचा जुना सहकारी नीथ मॅक्रिरन् होता. या दोन प्रेमळ मित्रांचा अधिक सहवास घडून त्यांच्याकडून बऱ्याच महत्त्वाच्या गोष्टीहि घडून आल्या.

सैनिकांना जीवनोपयोगी असें विविध प्रकारचें शिक्षण मिळालें पाहिजे व आनंददायी असें छंदहि त्यांना असले पाहिजेत, या दृष्टीनें 'बी. पीं'नीं पथकाचे कांहीं गट पाडले; आणि त्यांना नाट्य, संगीत, आदींचें पद्धतशीर शिक्षण देण्याची सोयहि करून दिली. पण या गोष्टी सुरू असतांच एक महत्त्वपूर्ण घटना आफ्रिकेमध्यें घडून येत होती व तेथेंच आमच्या चरित्रनायकाच्या जीवितामधील चित्तथरारक प्रसंग निर्माण व्हावयाचे होते. म्हणून आफ्रिकेच्या वातावरणाकडे आपण लक्ष देऊं.

—*—

# आफ्रिकेंतील नेमणूक व रजेचा काळ

ब्रिटिशांनीं जशा परदेशामध्यें वसाहती केल्या त्याचप्रमाणें डच लोकांनींहि आफ्रिकेमध्यें वसाहती केल्या होत्या. या डच वसाहतवाल्यांना 'बोअर' लोक असें म्हणतात. ट्रान्सवॉल व ऑरेंज फ्रीस्टेटमध्यें त्यांच्याहि आर्धांच्या वसाहती होत्या. आपल्या हद्दी वाढविण्याचें धोरण सर्वांचेंच असते आणि त्यामुळें अनेक कटकटी निर्माण होऊन युद्ध पेटतें कीं काय अशी परिस्थिति उत्पन्न झाली. १८८३ मध्यें 'बी. पीं.'ची कॅप्टनच्या हुद्यावर नियुक्ति होऊन त्यांची तेथें बदली झाली. द. आफ्रिकेमध्यें नाताळ प्रदेशांतील दरबान या ठिकाणीं ते दाखल झाले.

जो मनुष्य एकादें काम हौसेनें करतो त्याच्यावरच आणखी कामाचें ओझें लादण्यांत येतें. वायव्य सरहद्द प्रांतांत असतांना 'बी. पीं.'नीं नकाशे काढण्याच्या कामांतील कौशल्य प्रगट केलें होतें. आफ्रिकेंत ड्रेकन्सबर्ग पर्वतावरील प्रदेशाचे नकाशे तयार करण्याचें बिकट काम त्यामुळेंच त्यांच्यावर सोपविण्यांत आलें. हा प्रदेश प्रत्यक्ष युद्धक्षेत्र नसला तरी भावी काळामध्यें येथेंच संग्राम होण्याची शक्यता होती. शत्रूच्या मुलुखांत जाऊन तेथील प्रदेशाची पाहणी करणें हें काम जिवावरचें होतें; तरीसुद्धां 'बी. पीं.'नीं हें आव्हान स्वीकारलें.

....आणि एके दिवशीं 'बी. पीं.'च्या रेजिमेंटमधील मेजर साहेबांचे तंबूसमोर एक लाल दाढीवाला घोडेस्वार उतरला. त्याचे

कपडे मळकट होते व डोक्यावर भली मोठी हॅट होती. तंबूमध्यें तो डोकावून पाहूं लागला. मेजरसाहेबांनीं त्याच्याकडे पाहिलें; तेव्हां तो म्हणाला, 'Good day, sir.'

'Get out; you mannerless man!' मेजरसाहेब खेकसले. त्यांना त्या चमत्कारिक माणसाचा राग आला. ते तंबूबाहेर आले. तेवढ्यांत तो 'दाढीवाला' घोड्यावर टांग टाकून चालता झाला होता. हा घोडेस्वार म्हणजे कामगिरीवर निघालेले 'बी. पी.'च होते. आपण केलेलें वेषांतर कितपत साधलें आहे हें पाहाण्यासाठीं त्यांनीं ही चांचणी घेतली होती!

६०० मैलांचा प्रवास बी. पीं. नीं या प्रकारच्या वेषान्तरानेंच केला. खिशामध्यें एक छोटीशी वही ठेवून सुमारें एक महिना ते भ्रमण करीत होते. बोअर शेतकऱ्यांमधून वावरतांना केवळ समय-सूचकता व हजरजबाबीपणा एवढेच त्यांचे पाठीराखे होते. बोअर शेतकऱ्यांना या दाढीवाल्याबद्दल कोणताहि संशय आला नाहीं आणि जमा केलेल्या अमूल्य माहितीसह व नकाशांच्या कच्च्या टिपणांसह ते दरबान येथें येऊन दाखल झाले. कर्नलसाहेबांनीं त्यांची कौतुकानें पाठ थोपटली.

दरम्यानच्या काळामध्यें बोअर व ब्रिटिश यांच्यामध्यें तात्पुरता का होईना पण सलोखा झाला असल्यानें १३ व्या हुजार पलटणीला स्वगृहीं परतण्याची परवानगी देण्यांत आली. त्याप्रमाणें त्यांतील सर्व सैनिक इंग्लंडला रवाना झाले. 'बी. पीं.'नी पोर्तुगीज ईस्ट आफ्रिकेचा दौरा करण्याचें ठरविलें आणि तो पूर्ण केल्यावरच ते मायदेशीं परतले.

'बी. पीं.'च्या घरच्या पूर्वीच्या वातावरणामध्यें आतां खूपच बदल झाला होता. त्यांचे थोरले बंधु वॉरिंग्टन हे आतां बॅरिस्टर झाले होते; दुसरे एक बंधु जॉर्ज आपल्या समाजसेवेमुळें इतके लोकप्रिय झाले होते, कीं पार्लमेंटमध्ये सभासद म्हणून ते निवडून आले होते. 'बी. पी.' यांचें पहिलें पुस्तक 'Reconnaissance and Scouting' सर्वस्वीं त्यांच्या प्रोत्साहनानें व मदतीनें प्रकाशित झालें होतें. सर्वांत धाकटे बंधु गृहरक्षक दलामध्यें सामील झाले होते. त्यांची धाकटी बहीण एजेन्स आतां मोठी झाली होती. तिनें अनेक भाषांचें अध्ययन केलें होतें व भरतकाम, विणकाम, संगीत यांतहि ती चांगलीच निष्णात झाली होती. अशा रीतीनें सर्व मुलें केवळ मार्गाला लागलीं एवढेंच नव्हे तर चांगलीं कर्तबगारहि निघाल्यामुळें त्यांची आई हेन्रीएटा यांना समाजकार्य करण्यास अवसर मिळूं लागला. लंडन शहरांतील शाळा व हॉस्पिटल्स यांना भेटी देऊन व त्यांच्या अडीअडचणी समजून घेऊन, सुधारणा करण्याच्या दृष्टीनें जरूर व शक्य ती सर्व मदत त्या करीत असत. बी. पीं.ची बदलीहि कांहीं काळ इंग्लंडमध्येंच झाल्याकारणानें त्यांना फार आनंद वाटला.

नाट्यकलेचें महत्त्व मनोरंजनाच्या दृष्टीनें बरेंच आहे पण त्या बरोबरच हेरगिरी करतांनाहि या कलेची व्यावहारिक मदत होते हें जाणून इंग्लंडमधील आपल्या मुक्कामाचा उपयोग नाटयकलेची माहिती करून घेण्याच्या दृष्टीनें करावयाचा असें त्यांनीं ठरविलें, व त्या दृष्टीनें एका नाटक कंपनीमध्यें त्यांनीं प्रवेश मिळविला. यामुळें

किती तरी कलावंतांच्या व त्यांच्या दाट ओळखी झाल्या आणि कलेच्या दृष्टीनें चर्चा करण्याची संधि त्यांना मिळाली.

साध्यासुध्या प्रसंगांतूनहि कधीं कधीं मोठ्या गंमतीदार घटना कशा घडतात, तें पाहिलें म्हणजे त्याबद्दल विशेषच महत्त्व वाटतें. एका कामगाराची भूमिका 'बी. पी.' यांना वठवावयाची होती. त्यासाठीं लागणारा वेष परिधान करून ते एकदां बकिंगहॅम पॅलेस-शेजारच्या रस्त्यावरून चालले होते. पॅलेसकडे कांहीं 'शाही' पाहुणे रवाना होत असल्यानें त्यांना पाहण्यासाठीं लोकांची खूपच गर्दी झाली होती. अगोदरच लंडनसारखें शहर आणि त्यांत पॅलेसजवळचा रस्ता! या गर्दींतून वाट काढतांना एक गोष्ट बी. पी. यांच्या नजरेला आली कीं, कोणी तरी एक धटिंगण दारुडा दोन सुंदर मुलींशीं लगट करण्याचा प्रयत्न करीत आहे. त्याच्या तोंडची गलिच्छ भाषा आणि वर्तन पाहातांच 'बी पीं.'च्या तळपायाची आग मस्तकाला पोहोंचली. त्या दारुड्यावर त्यांनीं हल्ला केला आणि लाथेनें त्याला ठोकरलें. तो मनुष्य खरा दारुड्या नसावा, त्यानें तशी बतावणी केलेली असावी. कारण त्यानें सूड घेण्याच्या इच्छेनें आपला जंबिया बाहेर काढला व 'बी. पीं.'च्या अंगावर धांवून गेला. 'बी. पी.' सावध होते म्हणून निभावलें. तेवढ्यांत तेथें शिपाई आले व त्या गुंडाला अटक करण्यांत आली.

त्या दोन मुली कामगार—कन्याच होत्या. परमेश्वरानें आपला एक भाऊच आपल्या संकटप्रसंगीं पाठविला असें त्यांना वाटलें! त्या मुलींनीं 'बी. पीं'चे आभार मानले व अत्याग्रहानें आपल्या घराकडे चहापानासाठीं 'बी.पीं'ना त्या घेऊन आल्या. त्यांपैकीं

वि: ..........
नों: दि: ..........

एका मुलीचे पति जिम् बेट्स ह्यांची तेथें 'बी. पीं.'शीं ओळख झाली. नेहमींप्रमाणें 'बी. पीं'नीं आपलें खरें नांव न सांगतां 'चार्ली' असें नांव सांगून आपणहि कामगारच असल्याची बतावणी केली.

या प्रसंगानंतर दहा वर्षें निघून गेलीं. व्हिक्टोरिया राणीचा ६० वा वाढदिवस होता. त्या दिवशीं जिम बेट्स् आपली पत्नी व तान्ह्या बाळासह राणीची मिरवणूक पाहण्यास रस्त्यावरील गर्दींत उभा होता; आणि बी. पी. हे १३ व्या हुजार पलटणीचे सर्वाधिकारी म्हणून आपल्या लष्करी गणवेषांत वावरत होते. त्यांनीं इतक्या धांवपळीमध्येंसुद्धां आपली मानलेली बहीण व जिम बेट्स् यांची ओळख ठेवली; ते जवळ गेले आणि म्हणाले, 'नमस्कार, मिस्टर व मिसेस् बेट्स्, मला ओळखतां ना तुम्ही? पूर्वींचा तुमचा चार्ली म्हणजेच आत्तांचा कॅप्टन बेडन पॉवेल. माफ करा हं तेव्हां खोटं नांव सांगितल्याबद्दल.'

जिम व त्यांच्या पत्नी यांनीं आश्चर्यानें तोंडांत बोटच घातलें. आपली अब्रू बचावणारी ही व्यक्ति म्हणजे हे कॅप्टनसाहेबच तर! तेवढ्यांत 'बी. पीं.'नीं आपल्या नांवाचें एक कार्ड खिशांतून काढलें आणि मिसेस् बेट्स् यांच्या हातामध्यें तें देऊन सांगितलें, 'ताई, हें कार्ड तेथें दरवाजावर दाखवा. म्हणजे मिरवणूक पाहायला तुम्हांला चांगली जागा तेथें मिळेल....बराय्, ओळख ठेवा हं!' असें म्हणून 'बी. पी.' आपल्या कामगिरीवर निघूनहि गेले.

आपल्या या थोर उपकारकर्त्याबद्दल मिसेस् बेट्स्नां त्या वेळीं किती आदर वाटला असेल बरें!

—※—

# पुनश्च आफ्रिकेमध्यें

१८८७ मध्यें जनरल स्मिथ यांची नेमणूक द. आफ्रिकेचे 'जनरल ऑफिसर कमांडिंग' म्हणून झाली. आपले व्यक्तिगत चिटणीस म्हणून त्यांनीं 'बी. पीं.'चीच निवड केली. त्यामुळें त्यांना पुन्हां आफ्रिकेमध्यें जाणें भाग पडलें.

आफ्रिकेमध्यें त्या वेळीं ज्या हालचाली सुरू होत्या त्या समजण्यासाठीं व 'बी. पीं'च्या भावी आयुष्यांतील घडामोडींचें नीट आकलन होण्यासाठीं द. आफ्रिकेचा नकाशा नजरेखालीं घालणें आवश्यक आहे. झुलूलँड म्हणून जो प्रदेश आहे तो ब्रिटिशांच्या अंमलाखालीं होता व तेथें असलेल्या कांहीं झुलू प्रमुखांना तेथील विभागावर अधिकारी नेमण्यांत आले होते. असें असलें तरी कांहीं सत्ताधिकारी झुलूंना ब्रिटिशांचा वरचष्मा साहजिकपणें खपत नसे; अखेर १८८८ मध्यें 'दिनि झुलू' नांवाच्या सामर्थ्यसंपन्न नेत्याच्या मार्गदर्शनाखालीं या झुलूंनीं क्रान्तियुद्धास सुरुवात केली. पण झुलूंच्यामध्यें एकी नव्हती म्हणून म्हणा किंवा ब्रिटिशांच्या भूलथापांना त्यांतील कांहीं लोक बळी पडले म्हणून म्हणा, कांहीं झुलू नेते ब्रिटिशांशीं निष्ठा बाळगून राहिले आणि त्यांच्याच साहाय्यानें बंडाला तोंड देण्याचें ब्रिटिशांनीं ठरविलें.

जनरल स्मिथ व 'बी. पी.' दरबान येथें प्रथम गेले. Eshowe या ठिकाणाहून ५० मैलांवर ब्रिटिशांचे असिस्टंट कमिशनर ह्यांना एका किल्ल्यामध्यें झुलूंनीं कोंडून ठेविलें होतें. तेथील वेढा उठविण्यासाठीं 'बी. पी.' व जनरल मॅककिन् यांची नेमणूक झाली.

दिनि झुलू ही कांहीं सामान्य व्यक्ति नव्हती. त्याची अंगकाठी चांगलीच धिप्पाड असून त्याच्या डोळ्यांत आत्मविश्वासाचें पाणी खेळत असे. त्याच्यापाशीं अमोघ वक्तृत्वशक्ति होती; तो बोलूं लागला म्हणजे भोळेभाबडे पण शूर झुलू तरुण त्याच्याकडे चांगलेच आकर्षित होत व त्याचे अनुयायी बनत. दिनि झुलूच्या गळ्यामध्यें रुद्राक्षाची एक माळ असे व लोकांमध्यें त्यानें अशी श्रद्धा निर्माण केली होती कीं जोंपर्यंत ही माळ गळ्यांत आहे तोंपर्यंत झुलूंचा कधींहि पराभव होणार नाहीं. 'सेझा-बुश'मधील अत्यंत खडकाळ भागामध्यें त्याचें वास्तव्य असे. हातांतील शस्त्र कुशलतेनें पेलीत ह्या खडकावरून त्या खडकावर उड्या मारीत तो लीलेनें जाऊं शकत असे.

आपल्या २००० सैनिकांसह 'बी. पी.' युद्धक्षेत्राकडे निघाले. झुलूंची रणगर्जना त्यांनीं त्या ठिकाणीं प्रथमच ऐकिली. डोंगराळ भागांतून कुशलतेनें वाट काढीत ब्रिटिशसेना किल्ल्यानजीक पोहोंचली. दोन दिवस घनघोर लढाई झाली आणि शत्रूला वेढा उठविणें भागच पडलें. बऱ्याच झुलू नेत्यांना 'बी. पीं.'नीं अटकेंत टाकिलें, पण तेवढ्यांत दिनि झुलू मात्र हातावर तुरी देऊन निसटला आणि 'सेझबुश' येथें पोहोंचला. तेथेंहि ब्रिटिशांनीं त्याचा पिच्छा पुरविला.

या लढाईमध्यें 'बी. पी.' एका प्राणसंकटांतून निभावले. रानांतून वाट काढीत असतां झुलूंच्या एका छोट्याशा पथकानें त्यांना वेढलें, आणि एका धिप्पाड झुलूनें आपला भाला 'बी. पीं.'च्या पाठीवर रोखला. इतक्यांत ब्रिटिशांच्या बाजूस मिळालेल्या एका

झुलूनें किंकाळी मारून झुलू भाषेमध्यें सांगितलें, 'अरे, मारूं नका त्याला; तो आपला आहे.'

हे शब्द ऐकून मारणाऱ्या व्यक्तीच्या मनांत गोंधळ निर्माण झाला. 'बी. पीं.'नीं क्षणार्धांत सर्व परिस्थिति ओळखली आणि आपल्या अंगांतील सर्व कौशल्य पणाला लावून तेथून पोबारा केला.

पुढें लवकरच दिनि झुलूचें पारिपत्य करण्यांत 'बी. पीं.'ना यश मिळालें. या झुलू युद्धामध्यें 'बी. पीं.'ना ज्या दोन गोष्टींचें महत्त्व जाणवलें व प्रत्यक्ष त्यांचा पडताळाहि मिळाला त्यांचा समावेश पुढें 'स्काउट चळवळीमध्यें' त्यांनीं केला. त्या गोष्टी म्हणजे 'आरोळ्या व गर्जना' आणि 'ज़मिनीवरील पावलांच्या ठशांचा अभ्यास.' या ठशांच्या निरीक्षणानेंच शत्रुपक्षाकडे किती घोडेस्वार असावेत, हे घोडेस्वार दौडत गेले कीं सावकाश गेले इत्यादि गोष्टींची अचूक माहिती झुलू हेर सांगूं शकत.

१८८९ मध्यें स्वाझीलँडमध्यें आणि १८९० मध्यें माल्टामध्यें 'बी. पी.' यांची नेमणूक झाली. माल्टाला भूमध्य समुद्रांतील प्रमुख बेट म्हणून महत्त्वपूर्ण स्थान आहे. तेथें सर हेन्री स्मिथ यांची गव्हर्नर म्हणून नेमणूक झाली होती. स्मिथ हे 'बी. पीं'चे मामाच असल्यामुळें त्यांच्या घरीं सुखाचें गृहजीवन त्यांना बऱ्याच दगदगीच्या कालानंतर मिळालें.

तेथें शिपाई व सैनिक यांच्यासाठीं एक क्लब 'बी. पीं'नीं सुरू केला. त्याचीं विश्रांतिगृह, वाचनालय व करमणूक-थिएटर अशीं तीन अंगें होतीं. मिसेस् स्मिथ यांच्या मार्गदर्शनाखालीं एका नाटकांत 'स्त्री'पात्राचें काम करण्याचा प्रयोगहि येथें 'बी. पीं'नीं

केला. त्यांचें काम पाहतांना प्रेक्षकांची हंसून हंसून मुरकुंडी वळत असे. आपल्यामुळें इतरांना आनंद मिळतो यामध्येंच 'बी. पीं.'ना श्रेष्ठ प्रकारचें समाधान लाभे. नेहेमीं घरीं वागतांनाहि 'बी. पीं.'चा विनोदी स्वभाव त्यांना स्वस्थ बसूं देत नसे.

एकदां स्मिथ यांच्याकडे कोणी बडी पाहुणे-मंडळी आली होती. हॉलमध्यें त्या सर्वांचा 'खाना' सुरू होता. मिसेस् स्मिथ व 'बी. पी.' हे सुद्धां पाहुण्यांच्या समवेत खाद्यपदार्थांचा समाचार घेत होते. इतक्यांत मिसेस् स्मिथ यांच्या नांवें एक अर्जंट पत्र आलें. त्यांनीं तें उघडून पाहिलें तों त्यामध्यें त्यांच्या समोरच बसलेल्या पाहुण्यांचें व्यंगचित्र होतें. हें काम 'बी. पीं.'चेंच होतें. पण इकडे तिकडे लक्ष न देतां मोठ्या गंभीरपणानें तें गप्पा गोष्टी करीत होते. त्यांच्या या मिष्किलपणामुळें मिसेस् स्मिथ यांना मात्र हंसूं आवरणें मुष्कील झालें!

माल्टामधील सुखद वास्तव्यानंतर पुढें लवकरच इटली, ग्रीस, तुर्कस्थान, ऑस्ट्रिया वगैरे देशांमध्यें लष्करी पाहाणी करण्यासाठीं 'बी. पीं.'ची नेमणूक झाली; व त्यामुळें त्यांच्या अंगीं असलेल्या 'गुप्त हेरा'ला काम करण्यास वाव मिळाला.

ऑस्ट्रियामध्यें एका रणक्षेत्राचा नकाशा एका टेकडीवर बसून ते काढीत होते, इतक्यांत एका ऑस्ट्रियन लष्करी अधिकाऱ्याचें तिकडे लक्ष गेलें. 'बी. पीं.'च्या नजरेंतून ही गोष्ट निसटली नव्हती. तो अधिकारी जवळ येईपर्यंत 'बी. पीं.'नीं नकाशाच्या कागदावर आपलें दुसरेंच एक निसर्गचित्र बसविलें व तें पुरें करीत असल्याचा

आविर्भाव आणला. त्यामुळें हा कोणी हौशी चित्रकार असावा अशी त्या अधिकाऱ्याची समजूत झाली.

एकदां तर 'बी. पीं.'नीं शत्रूच्या लष्करी तळामध्येंच प्रवेश केला व तेथें बसून फुलपांखरांचीं रंगीबेरंगी चित्रें रेखाटलीं. सैनिक गोळा झाले. त्यांनीं त्या चित्रांचें कौतुकहि केलें, पण त्यांमधील एकाच्याहि ध्यानामध्यें ही गोष्ट आली नाहीं कीं फुलपांखरांच्या पंखावर ज्या वेड्यावांकड्या रेषा होत्या त्यांमध्यें कँपचा नकाशा समाविष्ट झाला होता व जेथें रंगीत ठिपके होते त्यामध्यें तोफांच्या मोर्च्यांचीं स्थानें लपलेलीं होतीं.

'बी. पीं'च्या अंगचे सद्गुण, त्यांचें कौशल्य व सामर्थ्य यांची पुरी ओळख ब्रिटिश सेनाप्रमुख लॉर्ड वुल्से यांना पटली होती. त्यामुळें १८९५ मध्यें आफ्रिकेंत अशांटी विभागांतील बंदोबस्ताच्या कामीं 'बी. पीं.'चें नांवच त्यांच्या डोळ्यांसमोर आलें.

—❀—

# ‘गोल्ड कोस्ट’ व ‘मातावेली लँड’

गिनीच्या आखाताशेजारीं ‘ गोल्ड कोस्ट ’ नांवाची एक ब्रिटिश वसाहत आहे. या वसाहतीच्या उत्तरेस छोटेंसें ‘अशांटी ’चें राज्य आहे. या राज्याची राजधानी ‘कुमासी ’ आहे. येथें प्रेम्पे नांवाचा राजा राज्य करीत असे. प्रेम्पेचें राज्य म्हणजे सुलतानशाहीच होती. कारण कोणत्या गुन्ह्यावरून कोणाला व केव्हां प्राणदंडासारखी शिक्षा केली जाईल हें सांगवत नसे. सर्वांनाच आपल्या सुरक्षिततेबद्दल शंका वाटत असे. ब्रिटिशांनीं या प्रेम्पे राजाचें उच्चाटण करावयाचें ठरविलें.

केप कोस्ट कॅसल या ठिकाणीं सर फॅन्सिस स्कॉट हे ब्रिटिश अधिकारी बरीच ब्रिटिश फौज घेऊन तळ ठोकून राहिले होते, पण तेथून कुमासीवर चाल करून जाणें ही कांहीं सोपी गोष्ट नव्हती. कारण सर्व प्रदेश घनदाट अरण्याचा होता व त्यांतून रस्ता काढणें फार अवघड काम होतें. ‘बी. पीं.’ची नेमणूक ‘कुमासी ’वर स्वारी करण्यासाठींच करण्यांत आली.

‘बी. पीं.’नीं आपल्या पथकाची उभारणी कौशल्यानें केली. त्यांनीं वेगवेगळ्या जमातींच्या टोळ्यांच्या टोळ्या आपल्या सैन्यामध्यें सामील करून घेतल्या. या सैनिकांना त्यांच्या आवडीचे असे भडक भडक रंगांचे गणवेष त्यांनीं दिले. रस्ता तयार करण्याचें काम मोठें दुर्घट होतें. तशांत पुरेश्या हत्यारांचाहि अभाव. त्यामुळें या पथकास अविश्रांत कष्ट करावे लागले. सैनिक कंटाळून गेले. केव्हां

सामोपचारानें तर केव्हां धाकदपटशा दाखवून त्यांच्याकडून 'बी. पीं.'नीं काम पूर्ण करून घेतलें. काम आटोक्यांत आलें, तेव्हां कुमासीचा मार्ग स्कॉट यांच्या सैन्यासाठीं खुला झाल्याचें दिसूं लागलें. 'बी. पीं.'नीं आपल्या सैनिकांना एकत्र केलें. या सैन्यामध्यें ब्रिटिशांच्याबद्दल निष्ठा व त्याचबरोबर कांहीं प्रत्यक्ष फायदा आहे असें ध्येय निर्माण केल्याखेरीज सैन्याचा प्रत्यक्ष संग्रामाचे वेळीं उपयोग होणार नाहीं, हें 'बी. पी.'नीं ओळखलें. आपल्या भाषणांत 'बी. पी.' म्हणाले, 'अन्यायी प्रेम्पे राजाला गिळून टाकण्यासाठीं आतां काळसर्प आपण सोडत आहोंत. या सर्पाचें अंग म्हणजे ब्रिटिश सेना आणि त्याचें भक्ष्य न्याहाळणारे डोळे म्हणजे माझ्या पलटणींतील तुम्ही शूर सैनिक!'

ही उपमा त्या सैनिकांना फार आवडली. आपली एकप्रकारें अधिकाऱ्यांनीं पाठच थोपटली, याचा त्यांना आनंद वाटला. त्यांच्यातील एक सैनिक म्हणाला, 'आम्ही जर काळसर्पाचे डोळे असूं तर आमचे सेनानी बेडन पॉवेल हे मेंदू आहेत!' सर्वांनीं टाळ्यांचा कडकडाट केला. आनंदानें आरोळ्या ठोकल्या. त्या आरोळ्या 'बी. पीं.'नीं टिपून घेतल्या व त्यांचें भाषांतर करून आपल्या डायरींत लिहून ठेविलें—

"If I go forward I die.
If I go backward I die.
Better to go forward & die."

कुमासीचे आसपास चिखलाचा जणूं खंदकच होता. त्यांतून वाट काढणें अवघड होतें, तरीसुद्धां १७ जानेवारी रोजीं 'बी.पी.'

आपल्या तीन सहकाऱ्यांसह ससैन्य कुमासीमध्यें घुसले. तेथील सर्वसामान्य जनतेनें ब्रिटिश सेनेचें स्वागतच केलें. रक्तपाताविना कुमासी सर झालें ! प्रेम्पेला अटक करून हद्दपार करण्यांत आलें. अशा रीतीनें अशांटीची मोहीम संपली.

यानंतर केप-कोस्ट कॅसलला ' बी. पी.' परत आले. त्या वेळीं एकंदर श्रमामुळें त्यांना इतकी ग्लानि आली होती कीं, जेवतां जेवतांच त्यांना जी झोंप लागली ते त्यानंतर तब्बल बारा तासांनीं जागे झाले !

' बी. पीं.'नीं केलेल्या अविश्रांत मेहनतीची, कर्तृत्वाची त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना जाणीव झाली व त्यांची ' लेफ्टनंट कर्नल'च्या जागेवर बढती करण्यांत आली.

द. आफ्रिकेमध्यें ऱ्होडेशिया म्हणून एक भाग आहे. त्याच्या दक्षिणेस माताबेलीलँड म्हणून प्रदेश आहे. त्यामध्यें राहणाऱ्या लोकांना ' माताबेली ' असें नांव आहे. हे लोक धिप्पाड बांध्याचे व अत्यंत शूर आहेत. ब्रिटिशांचें वर्चस्व त्यांना कधींच सहन होण्यासारखें नव्हतें. १८९४ सालीं माताबेली लोकांनीं उठाव केला, पण ब्रिटिशांनीं तो शस्त्रांचे बळावर मोडून काढला. परकीयांनीं आपल्या देशावर आक्रमण केलें आहे याची जळती जाणीव माता-बेलींच्या मनांत असतां त्यांचीं मनें अधिकच प्रक्षुब्ध करणारी एक नैसर्गिक घटना घडली. त्यांच्या देशावर टोळांनीं धाड घातली व साऱ्या पिकांचा त्या टोळांनीं फन्ना उडविला. या संधीचा फायदा ' उमलिनो ' या माताबेलींच्या नेत्यानें घेतला व बुलवायो ठाण्याच्या आसपासच्या गोऱ्या लोकांची कत्तल करण्यास त्यानें सुरुवात केली

या कत्तलीची हकिगत ब्रिटिशांना समजल्यावर जनरल कॅरिंग्टन यांना बुलवायोकडे जाण्याबद्दल तांतडीनें हुकूम झाला. 'बी. पी.' या वेळीं आयर्लंडमध्यें गेले होते. त्यांनाहि कॅरिंग्टनच्या मदतीसाठीं जाण्याची आज्ञा मिळाली. १९ मे १८९६ मध्यें 'बी. पी.' पुनश्च द. आफ्रिकेंत केपटाऊन येथें दाखल झाले.

बुलवायो शहराच्या बचावासाठीं कांटेरी तारांचें कुंपण घालण्यांत आलें. मेजर प्लूमर एक हजार सैनिकांसह तेथें होते. ३ जूनला कॅरिंग्टन व 'बी. पी.' तेथें येऊन पोहोंचले.

आपला शत्रु सावध झाला आहे हें पाहून बंडखोरांनीं मॅटोपो टेकड्यांचा आश्रय केला व गनिमी-काव्याची लढाई सुरू केली. रानावनांतून दऱ्याखोऱ्यांतून व गुहांमधून बंडखोर लपून बसत व संधि साधून ब्रिटिशांवर बंदुकींच्या गोळ्यांचा वर्षाव करीत. सर्व मॅटोपो टेकड्यांमधून निर्भयपणें संचार करून दहशत निर्माण केल्याखेरीज काम भागणार नाहीं हें जाणून 'बी. पी.' निडरपणें बाहेर पडले.

एकदां एका ओढ्यापाशीं प्लूमर व 'बी. पी.' आपल्या शूर सैनिकांसह घोड्यावरून आले. या ओढ्यापलीकडेच बंडखोर जमले होते. पण त्यांनीं एक गोळीहि झाडली नाहीं. कारण या ओढ्या-बद्दल माताबेली लोकांत अशी समजूत होती, कीं जादूच्या मंत्रानें तेथील पाणी 'उमलिनो' यांनीं भारून ठेविलें आहे, आणि त्यामुळें गोरे सैनिक त्यांतून पलीकडे येऊंच शकणार नाहींत; त्यांचे घोडे त्या पाण्यांतच बुडतील. ब्रिटिश सैन्य ओढ्यांत उतरलें तेव्हां माताबेली लोक केवळ मौज पाहात उभे राहिले. पण त्यांच्या

अपेक्षेच्या चिंधड्या उडाल्या! जादूटोण्याचा गोऱ्या सैन्यावर किंवा त्यांच्या घोड्यांवर कांहीं परिणाम तर झाला नाहींच, उलट 'बी.पीं'नीं पलीकडे जातांच बंडखोरांवर जोराचा हल्ला चढविला. याहि वेळीं केवळ नशीबामुळें 'बी. पी.' प्राणसंकटांतून बचावले. माताबेली बंडखोरांनीं बंदुकीच्या फैरी झाडल्या. त्यांतील एक गोळी 'बी.पीं'च्या कानाजवळून गेली. तरीसुद्धां ते पुढेंच सरकले. पुढें एका झाडाजवळ ते आले तेथें वरच एक माताबेली सैनिक चढून बसला होता. त्यानें 'बी. पीं'च्या डोक्यावर नेम धरून गोळी झाडली. केवळ दैवयोगानें ती चुकली व त्यांच्या पुढ्यांत जमिनीमध्यें खोल घुसली. 'बी.पीं.'च्या हातून पुढें जें महान् कार्य व्हावयाचें होतें त्यासाठींच या गोष्टी घडल्या असें मानणें चुकीचें होईल काय?

अशाप्रकारें जिवावर उदार होऊन पुढें घुसणाऱ्या या ब्रिटिश सेनानीची माताबेली लोकांनीं धास्तीच घेतली. त्यांनीं 'बी. पीं.'ना 'कधींहि न झोंप घेणारा कोल्हा' हें सार्थ नांव दिलें. कोल्हा लुच्च्या असला तरी झोंपेमध्यें तरी तो असावध असतो; पण युद्ध-कौशल्यामध्यें कोल्ह्याप्रमाणें चतुर असलेल्या 'बी. पीं.'ना त्यांनीं असावध असें कधींच पाहिलें नाहीं. सुमारें चार महिने रेंगळणारें हें युद्ध लवकरच संपलें. (नोव्हेंबर १८९६)

युद्धकालामध्येंहि 'बी. पीं.'नीं आपली दैनंदिनी उत्तम तऱ्हेनें लिहून ठेविली होती. डिसेंबरमध्यें ते जेव्हां मायदेशीं परत गेले तेव्हां त्यांनीं 'The Matabele Campaign' हें पुस्तक प्रसिद्ध केलें. आपल्या माताबेलीलँडमधील जीवनास 'आयुष्यांतील सर्वोच्च साहस' असें ते मानीत असत. या साहसाचें फल त्यांना लवकरच

मिळालें. त्यांची बढती लवकरच ‘कर्नल’च्या मानाच्या हुद्द्यावर झाली.

कर्नल ‘बी.पी.’ इंग्लंडमधून डब्लिन येथें गेले व आपल्या प्रिय १३ व्या हुझार पलटणीच्या कामाचा चार्ज त्यांनीं पुन्हां घेतला; तोंच त्यांची बदली हिंदुस्तानमधील ‘५ ड्रॅगन गार्डस्’ या पलटणीचे नायक म्हणून झाल्याची वार्ता आली. हुझार पलटणींतील सैनिकांना ‘बी. पीं.’बद्दल अत्यादर वाटत असे. त्यामुळें त्यांनीं जो निरोपसमारंभ तेथें केला त्यांत लवमात्र देखावा नव्हता. सदा स्मित-मुख असणारे ‘बी. पीं.’ना सुद्धां त्या वेळीं गहिंवरून आलें.

‘बी. पीं.’ची थोर सेनानी म्हणून कीर्ति झाली ती केवळ ते रणांगणावर शूर होते एवढ्यामुळेंच नव्हे, तर त्यांना आपल्या सैनिकांबद्दल अत्यंत जिव्हाळा व आपुलकी होती म्हणून. सामान्य सैनिकाच्या सुखदुःखाकडे त्यांची प्रेमार्द्र नजर नेहमींच असे आणि इतरांना अधिकाधिक सुखी करण्याच्या त्यांच्या ‘आयुष्याच्या तत्त्वज्ञानां’मुळें त्यांच्या हातून खूपच भरीव कामगिरी झाली.

ड्रॅगन् गार्डस् ही तुकडी मीरत या ठिकाणीं होती. त्या तुकडींतील बरेच सैनिक ताप आणि किरकोळ आजार यांनीं अगदीं गांजल्यासारखे झाले होते. ‘बी. पीं.’नीं याची कारणमीमांसा काय केली? तर या सैनिकांच्या आहारामध्येंच दोष आहे. तो दूर करण्याचे हेतूनें व सैनिकांना सकस दूध व पौष्टिक पदार्थ मिळावें यासाठीं कँपमध्येंच एक उपाहारगृह त्यांनीं काढलें. त्या ठिकाणीं पाव, ताजें लोणी, दूध आणि आरोग्यदायी शीत पेयें नियंत्रित दरामध्यें मिळत असत. या गोष्टीचा सुपरिणाम लवकरच

दिसूं लागला; सैनिक सशक्त व उत्साही बनूं लागले. दुसरी गोष्ट म्हणजे, ‘करमणूक’. ही प्रत्येक मानवाची एक गरजच आहे. ‘बी. पीं.’ना त्याचा अभाव मीरत येथें दिसून येतांच त्यांनीं एक तेथें नाट्यमंडळहि स्थापन केलें.

एकदां एका नाटकाच्या स्टेजवर ‘प्रायव्हेट ब्राऊन’ नांवाचा कोणी नट आपल्या भसाड्या आवाजामध्यें कांहीं गाणीं प्रेक्षकांना ऐकवूं लागला. त्याचें तें ‘संगीत’ ऐकून लोकांनीं शिट्ट्या मारून आपली तीव्र नापसंती व्यक्त केली. ‘बरं बाबांनो, तुम्हांला ऐकायचें नाहीं ना; तर जातों आम्ही,’ असें म्हणून प्रायव्हेट ब्राऊन परत पडद्याकडे निघाला. तेवढ्यांत एका चाणाक्ष अधिकाऱ्याला परिस्थिति उमगून आली आणि तो म्हणाला, ‘अहो, हे तर आपले कर्नल ‘बी. पी.’ आहेत.’

‘बी. पीं.’नीं आपल्या वेषांतरानें सर्वांनाच ठकविलें होतें. लोकांनीं पुन्हां एकवार त्यांना स्टेजवर बोलाविलें, तेव्हां मात्र सुंदर सैनिकगीत गाऊन दाखवून ‘बी. पीं.’नीं सर्वांना दुसऱ्यांदा चकित केलें. वेषांतराची कला त्यांच्यांत प्रकर्षानें होती. ते खरे स्काऊट (हेर) होते.

‘बी. पीं.’ची निरीक्षणशक्ति किती सूक्ष्म होती याचा पुरावा देणारा एक गंमतीदार प्रसंग हिंदुस्तानांत घडला. एकदां त्यांच्या तंबूंतून कोणीतरी रात्रीच्या वेळीं सायकल पळवून नेल्याचें आढळून आलें. ‘बी. पी.’ गडबडून गेले नाहींत. भल्या पहाटें ते उठले व त्यांनीं तंबूबाहेरील जमिनीचें सूक्ष्म निरीक्षण केलें. तेथें त्यांना सायकलच्या चाकांचा माग जमिनीवर उठलेला दिसला. त्याच्या अनुरोधानें ते

गेले आणि एका रखवालदाराचे घरीं सायकल टेकवून ठेवलेली त्यांना आढळून आली. त्यांनीं आंतील माणसास चांगलें हांसडलें आणि सायकल घेऊन परतले.

१८९९ च्या मे महिन्यापर्यंत ते हिंदुस्तानामध्यें होते. त्याच काळांत काश्मीरला त्यांनीं भेट दिली. 'बी. पीं.'च्या सारखा निसर्ग-प्रेमी आणि तो भूभाग म्हणजे सृष्टिसौंदर्याचें वरदान असलेला! मग 'बी. पीं.'ना आपण नंदनवनामध्यें असल्याचा भास झाला असल्यास नवल नाहीं. झेलमच्या कांठावरील गुलाबाच्या ताटव्यांनीं व इतर हंसऱ्या फुलांनीं त्यांचें मन मोहून गेलें. त्यांच्या कौशल्यपूर्ण कुंचल्यांतून किती तरी निसर्गदृश्यें चितारलीं गेलीं. 'बी. पीं.'चें सर्वश्रेष्ठ पुस्तक 'Aids to Scouting' हें मानलें जातें; त्या पुस्तकाची कच्ची रचना—आराखडा—काश्मीरमध्यें झाला, या गोष्टीचा भारतीयांना अभिमान वाटेल.

सिमला येथें असतांना 'बी. पीं.'नीं एका इटालियन उमरावाचें सोंग इतक्या बेमालूम पद्धतीनें वठविलें होतें कीं त्यांचे सर्व निकटवर्ती सहकारीसुद्धां फसले व ते मोडक्या तोडक्या फ्रेंच भाषेंत आपल्या इटालियन पाहुण्याची चौकशी करूं लागले. त्यांची नम्रता व घाबरटपणा पाहून 'बी. पीं.'ना हंसूं आवरेना. शेवटीं त्यांनीं स्वतःच आपण खरे कोण आहोंत हें प्रगट केलें. या ठकवाठकवीबद्दल त्यांच्या सहकाऱ्यांनीं 'बी. पीं.'ना सतरंजीमध्यें गुंडाळलें व चोप दिला.

१८९९ सालच्या अखेरीला 'बी. पी.' इंग्लंडला परत गेले. त्या वेळीं आफ्रिकेमध्यें बोअर लोकांनीं युद्ध सुरू केल्याच्या बातम्या आल्या. ऑरेंज-फ्री स्टेट आणि ट्रान्सव्हालमधील बोअर लोकांनीं

आपल्या वसाहतीच्या मर्यादा वाढविण्याची आकांक्षा धरून शस्त्र उपसलें होतें. 'बी. पीं.'ची नेमणूक आफ्रिकेंतील या कामगिरीवर झाली; त्यांचेबरोबर लॉर्ड एडवर्ड सेसिल् यांची नेमणूक 'चीफ ऑफ स्टाफ' म्हणून झाल्याचेंहि घोषित झालें.

आफ्रिकेमधील कामगिरी पुन्हां मिळाल्यामुळें 'बी. पीं.'ना इतका आनंद झाला कीं ते उड्या मारीतच घराकडे परतले. संकट हें शूरांना शौर्य दाखविण्याची संधि असते, म्हणून संकटांचें स्वागतच ते करितात. आफ्रिकेला जाण्यापूर्वीं आपले प्रिय शिक्षक डॉ. हेग ब्राऊन यांची त्यांनीं भेट घेतली. त्या वेळीं डॉक्टरसाहेबांनीं 'हा माझा विद्यार्थी नक्कीच जगभर प्रसिद्ध होणार,' असे उद्गार काढले. त्यांचें हें भाकीत लवकरच खरें ठरलें.

—*—

# मेफिकिंगचा वीर

द. आफ्रिकेचा नकाशा पाहिला असतां आपल्या हें ध्यानांत येईल, कीं केप कॉलिनीच्या सरहद्दीवरील मेफिकिंग हें एक अत्यंत मोक्याचें ठिकाण आहे. द. आफ्रिकेचें तें केवळ नाकेंच नसून प्रत्यक्ष नाक आहे. तें ठिकाण सुरक्षित राखण्यावरच ब्रिटिशांच्या वसाहतींचें अस्तित्व टिकणार होतें. ब्रिटिशांच्या प्रमाणेंच डच लोकांनींहि आफ्रिकेमध्यें आपल्या वसाहती स्थापन केल्या होत्या. या वसाहतवाल्या डच लोकांनाच 'बोअर' म्हणत असत, आणि याच बोअर लोकांनीं युद्धाचे पडघम वाजविण्यास सुरुवात केली होती. म्हणजे आतां जो सामना होणार होता तो आफ्रिकेंतील मागासलेल्या लोकांशीं नसून ब्रिटिशांसारख्याच सुधारलेल्या आणि युद्धकलेमध्येंहि निष्णात असलेल्या लोकांशीं होता.

मेफिकिंग गांव मोलोपो नदीच्या काठीं असून त्याची वस्ती सुमारें ८००० असावी. 'बी. पीं.'ची नेमणूक या गांवाचें संरक्षण करण्याच्या कामीं झाली होती. त्यांनीं तेथें केलेली पहिली गोष्ट म्हणजे गांवाभोंवतीं खंदक काढण्याच्या कामाची सुरुवात. या गोष्टीमुळें दोन गोष्टी साधणार होत्या. शत्रूला त्यामुळें पुढें सरकणें अवघड तर होणार होतेंच, पण शिवाय खंदकांतून काढलेल्या मातीच्या ढिगाऱ्याचा उपयोग त्याच्या आड लपण्यासाठीं व शत्रूवर गोळ्यांची सरबत्ती करण्यास आडोशासारखा होणार होता. युद्धाला प्रत्यक्ष तोंड लागल्यास त्याचीहि तरतूद म्हणून लांब पल्याच्या तोफांचे मोर्चे बांधणें व सर्च लाईटचे खांब उभारणें या गोष्टींचीहि

त्वरेनें सिद्धता त्यांनीं सुरू केली, पण तिकडे शत्रूचीहि हालचाल तशीच जोराची चालू होती.

१६ ऑक्टोबर १८९९ रोजीं शत्रुपक्षाचा सेनानी कॉजे हा आपल्या ६००० शूर व सुसज्ज सैनिकांसह मेफिकिंगनजीक आला व त्यानें अल्पावधींत गांवाला वेढाहि दिला. हा वेढा सुमारें ६ मैल परीघाचा होता. गांवामध्यें घुसण्याचाहि थोडासा प्रयत्न करून पहावा या इराद्यानें शत्रुपक्षाच्या छोट्याशा तुकडीनें तसा प्रयत्न करून पाहिला मात्र, त्यावर ब्रिटिशांनीं असा कांहीं भडिमार केला कीं हल्ल्याचा परिणाम काय झाला हें सांगायला सुद्धां कोणी बोअर सैनिक परत जाऊं शकला नाहीं ! ‘ न झोंपणारा कोल्हा ’ सतत बुरुजावर उभा राहून टेहळणी करीत होता ना !

मेफिकिंग हें रेल्वे स्टेशन होतें व तेथून पुढें जातांना उतार होता. वेढा घातलेल्या सैन्यानें रेल्वेच्या मार्गावरच एक तळ उभा केला होता. ह्या तळाचा नाश करण्यासाठीं ‘बी. पीं.’नीं एक अजब शक्कल काढली. मेफिकिंग स्टेशनमध्यें दारुगोळ्यानें भरलेल्या दोन वॅगन्स होत्या. या वॅगन्सनां मागें इंजिन जोडून खूप वेग देण्यांत आला व शंटिंग करतांना जसे मोकळे डबे लोटून देण्यांत येतात त्याप्रमाणें त्या सुट्या वॅगन्स बोअर तळाकडे ढकलून देण्यांत आल्या.

बोअर लोकांना वाटलें बहुधा यांमधून ब्रिटिश सैन्य आलें असावें, म्हणून त्यांनीं वॅगन्सवर गोळ्यांचा भडिमार केला. आणि त्याच क्षणीं भयंकर असा स्फोट झाला. खूपच सैनिक मृत्युमुखीं पडले. आणि याहिपेक्षां महत्त्वाची गोष्ट म्हणजे, ब्रिटिश सैन्य संख्येनें थोडें आहे, आपण सहज त्यांचा पराभव करूं, ही जी

बोअर सेनानींची कल्पना होती तिच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडाल्या. एक प्रकारची दहशत निर्माण झाली.

बोअर अध्यक्ष क्रूगर यांना 'बी. पीं.'च्या कर्तृत्वाची जाणीव होती. त्यांनीं त्यांना निरोप पाठविला—'तुमचें सैन्य कमी आहे. परिस्थिति लवकर ओळखा. आतां निष्कारण रक्तपात होऊं न देतां शरण या.'

या संदेशास 'बी. पीं.'नीं एवढेंच उत्तर पाठविलें-- 'रक्तपात ! पण तो कुणाचा होऊं नये एवढें कळवावें.'

या उत्तरांतील खोंच क्रूगर यांना चांगलीच झोंबली. 'बी. पीं.'नीं पुढें कळविलें कीं—'मेफिकिंगच्या सर्व बाजूंनीं भुईसुरुंग पेरले आहेत. आपल्या सैनिकांनीं पुढें येण्यापूर्वीं विचार करावा.'

बोअर सेनानींनीं विचार केला, आतां मेफिकिंगची चांगली गठडी वळूं या. वेळींअवेळीं बोअर तोफा धडाडूं लागत आणि गोळे गांवामध्यें येऊन पडत. कोणत्या इमारतीवर गोळे पडतील व ती जमीनदोस्त होईल हें सांगवत नसे. धुराळा, किंकाळ्या व प्रत्युत्तर म्हणून ब्रिटिश तोफांचा धडधडाट व बंदुकीच्या गोळ्यांचा सणसणाट यांनीं वातावरण भरून जाई. तरीसुद्धां 'बी.पी.' मुळींच डगमगले नाहींत. त्यांना कोसळणाऱ्या इमारतींबद्दल चिंता नव्हती, फक्त सैनिकांचें व लोकांचें धैर्य खचूं नये एवढीच काळजी होती; त्यासाठीं त्यांचे परिश्रम चालू होते. जे ब्रिटिश सैनिक मृत होत त्यांच्या शवाचा संस्कार आदरपूर्वक पण गाजावाजा न करतां केला जाई. गांवामध्यें युद्धवार्ता देण्यासाठीं 'मेफिकिंग मेल' म्हणून वृत्तपत्र छापलें जाई व त्यामधून उत्साहदायी बातम्या पुरविल्या जात. दर रविवारीं चर्चमध्यें प्रार्थना होई व त्यानंतर 'शांति व धैर्य' निर्माण करणारें प्रवचन होई.

गांवामध्यें कोंडलेल्या सैन्याला ५ मैल लांबीची आघाडी लढवावयाची होती. त्यासाठीं लागणारी सैन्यसंख्या मुळांत कमी होतीच, आणि या धुमसत्या लढाईमुळें अनेक सैनिक कामीं आले किंवा जखमी झाले होते. या लोकांची उणिव भरून कशी काढावयाची, हा एक मोठाच प्रश्न होता. एकेक सैनिक लाख मोलाचा होता. 'बी. पीं.' चे सहकारी लॉर्ड सेसिल् यांना एक कल्पना सुचली. लहान-सहान अशा कितीतरी जुजबी कामांसाठीं अनेक सैनिक गुंतलेले असत; त्यांतून त्यांची सुटका केल्यास एका परीनें सैन्याची संख्या वाढविल्याचेंच श्रेय मिळेल अशा कल्पनेनें, सेसिल् यांनीं ९ वर्षांच्या वरील मुलांचें एक पथक तयार केलें, त्याला थोडेंसें लष्करी शिक्षणहि दिलें, व विशिष्ट असे गणवेशहि या पथकाला देण्यांत आले. या नवीन सेनेचें नेतृत्व 'गुडइयर' नांवाच्या मुलानें केलें होतें. संदेश पोहोंचविणें, टपाल अगर वृत्तपत्रें वांटणें यासारखीं कामें या पथकावर सोपाविण्यांत आलीं. आश्चर्याची गोष्ट ही कीं, या बालवीर सेनेनें अत्यंत चलाखीनें आपलीं कामें पार पाडलीं. बंदुकींच्या फैरी झडल्या जात असतांहि न डगमगतां हीं मुलें संदेश पोहोंचविण्याचें काम प्रत्यक्ष आघाडीवर सुद्धां जाऊन करीत असत.

एकदां एक महत्त्वाचा संदेश घेऊन एक 'बाल'वीर 'बी. पीं.'च्या जवळ आला. त्यांनीं त्या मुलाला विचारलें, 'काय रे, तुला बंदुकीच्या गोळ्यांची भीति वाटत नाहीं का ?'

त्या मुलानें आपल्या कपाळावरील घाम पुशीत अभिमानानें उत्तर दिलें, 'छे:, मुळींच नाहीं ! मी सायकल इतक्या वेगानें चालवितों कीं गोळ्या माझ्यापर्यंत पोहोंचूं शकत नाहींत.'

८८९०

या उत्तरानें 'बी. पी.' स्तिमित झाले. मुलांच्या दुर्दम्य इच्छाशक्तीचा प्रत्यय त्यांना या ठिकाणीं आला; त्याचा परिणाम त्यांच्या भावी जीवनावर विलक्षण झाला. मुलांच्यासाठीं किंवा तरुणांच्यासाठीं 'बी. पीं.'नीं पुढें जें जागतिक आंदोलन महान् आत्मविश्वासानें सुरू केलें, आणि त्याला तरुणांनीं जी अजोड साथ दिली त्याचें बीज, मला वाटतें, मेफिकिंगमधील वरील प्रसंगांतच आहे.

वेढ्यांतील एकेक दिवस फार कष्टाचा जात होता. आज काय पिण्याचें पाणी संपुष्टांत येण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं; उद्यां काय अन्न-पदार्थांची टंचाई दिसूं लागली; तर परवां आजाराची सांथ पसरण्याचीं चिन्हें.... अशा अनेकविध काळज्या होत्या. गांवांतील पिण्याच्या पाण्याची टाकी शत्रूंनीं केव्हांच फोडून टाकिली होती. विहिरी खोदण्याचा प्रयत्न सुरू झाला. अन्नाचा प्रश्न सोडविण्यासाठीं बैल, घोडे यांच्या मांसाचा उपयोग नाइलाजानें करावा लागला. कोंबड्याचीं पिलें आणि अंडीं फक्त 'हॉस्पिटल'साठीं राखून ठेवण्याचे हुकूम निघाले. आर्थिक टंचाई भरून काढण्यासाठीं नवीन नोटा छापण्यांत आल्या. या नोटांवर मेफिकिंगच्या लढ्यामध्यें कामीं आलेल्या शूर सैनिकांचीं चित्रें घालण्यांत आलीं होतीं आणि वेढा उठतांच नोटांबद्दल रोख नाणीं बदलून मिळण्याचें आश्वासनहि छापण्यांत आलें होतें. (पण पुढें सुमारें ५००० पौंड किंमतीच्या नोटा लोकांनीं परत केल्या नाहींत. मेफिकिंगची स्मृति म्हणून त्यांनीं त्या राखून ठेवल्या!)

एप्रिल महिन्यामध्यें 'सॅरिल एलोफ्' नांवाचा एक तरुण बोअर सेनानी १००० सैन्याची कुमक घेऊन बोअर सैनिकांच्या

साहाय्यास आला. त्यानें एकदम चढाईचें धोरण स्वीकारलें. एकदां एका झटापटींत त्यानें इंग्लिश सेनानी 'होअर' याचा पराभव करून त्याला कैदहि केलें. 'बी. पी.' हा सर्व प्रकार दुरून पाहात होते. योग्य वेळीं जरूर तेवढी कुमक पाठवून त्यांनीं प्रतिहल्ला चढविला व 'एलोफ' महाशयांना शरण येणें भाग पडलें. या पराभूत सेनापतीला 'बी. पीं.'नीं अत्यंत आदरानें वागविलें.

मे महिन्यामध्यें ब्रिटिश सेनेला आफ्रिकेमध्यें इतरत्र विजय मिळूं लागल्याच्या बातम्या येऊं लागल्या; १६ मे रोजीं तर 'कर्नल प्लूमर त्वरेनें मदतीस येत आहेत, धीर धरा' अशा आशयाची चिठ्ठी पाया-मध्यें बांधलेलें एक कबूतर मेफिकिंगमध्यें उतरलें. आणि दुसऱ्याच दिवशीं म्हणजे १७ मेला मेफिकिंगचा वेढा फोडून ब्रिटिश सेना मेफिकिंगमध्यें आली. वेढा २१७ दिवस म्हणजे सात महिने पडला होता. 'बी. पीं'चें सारें युद्धकौशल्य या अवधींत पणाला लागलें होतें.

मेफिकिंगच्या सुटकेच्या वेळचा प्रसंग आपल्या आईला लिहिलेल्या पत्रामध्यें 'बी. पीं.'नीं खालीलप्रमाणें वर्णिलेला आहे.

*'दि. १६ ला ब्रिटिशांच्या तोफांचे आवाज ऐकूं येऊं लागले. त्या वेळीं पश्चिमेकडून आमच्याकडे मदत येत आहे असें हेरून आम्हीं वेढा फोडण्यासाठीं पुढें सरसावलों. दुसरे दिवशीं सकाळीं आम्हीं आपल्या सर्व सैन्यासह बोअर सैन्याच्या प्रमुख तळावर व खंदकावर हल्ला चढविला. त्याबरोबर तेथें थोडा वेळहि न लढतां ते ट्रान्सवॉलकडे चालते झाले. दुसरे दिवशीं*

*पहांटें ३ वाजतां बेडननें ( धाकटा भाऊ ) मला झोंपेंतून जागें केलें. त्या वेळीं मला आनंदाचें भरतें आलें हें सांगणें नकोच. सुटका झाल्यामुळें मला अत्यंत आनंद झाला व एकप्रकारची शांति मिळाली. या काळापर्यंत मनांतील चिंता मनांतच दाबून ठेवून तोंडावर कृत्रिम हास्य उमटविण्याचें काम मला करावें लागे.'*

'बी. पीं.'ना बेडन फ्लेचर या नांवांचे कनिष्ठ बंधु होते. तेहि इंग्रज सैन्यामध्येंच अधिकारी होते आणि मेफिकिंगची सुटका करणाऱ्या सैन्यामध्यें ते सामील झाले होते. वरील पत्रामध्यें त्यांचाच उल्लेख आहे. मेफिकिंगच्या यशस्वी लढ्याचे वेळीं 'बी. पीं'नीं केलेल्या अपूर्व कामगिरीची लॉर्ड उल्झे आणि रॉबर्ट्स् यांनीं अगदीं मुक्त कंठानें स्तुति केली, व त्यांची शिफारस 'मेजर जनरल' या हुद्द्याच्या जागेसाठीं राणीकडे केली. सम्राज्ञीनें व्यक्तिशः 'बी.पीं.'चा गौरव करून त्यांना 'मेजर जनरल' करण्यास मान्यता दिली. या वेळीं 'बी. पीं.'चें वय ४३ वर्षें होतें. कर्तव्य करीत असतांना जें कांहीं आपल्या हातून घडलें तें एक महान् देशकार्य होतें आणि त्याची महती पृथ्वीमोलाची होती, याची खुद्द 'बी. पीं.'ना जाणीवहि नव्हती. कर्तव्याचरणांतच ते दंग होऊन गेले होते. पण तिकडे इंग्लंडमध्यें सर्वत्र 'बी. पीं.'चा जयजयकार चालला होता. या जयजयकाराचें खरें कारण काय होतें बरें ? पुढील प्रकरणामध्यें आपण त्याचा विचार करूं.

—*—

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थल
अनुक्रम २३८८४ वि: चरित्र
क्रमांक ८७६ नों: दि: १९४९

# थोर सेनानीचा जयजयकार

बोअर युद्धाच्या प्रारंभीं ब्रिटिश जनतेला आफ्रिकेमधील बोअर लोकांच्या सामर्थ्याविषयीं यथार्थ कल्पना नव्हती. ते आपल्याच घमेंडींत होते. पण त्यांची ती घमेंड हळूहळूं उतरली. सर्व आघाड्यांवरून पराभवाच्या बातम्या येऊं लागल्या; व एक काळ तर असा आला कीं द. आफ्रिकेंतून आपला गाशा गुंडाळून परत जावें लागतें कीं काय, असें वाटण्याचा प्रसंग ब्रिटिशांवर आला. या वेळीं फक्त एकच आशेचा किरण दिसत होता. आपल्या निडर व दमदार धोरणांनीं ज्या 'बी. पीं.'नीं इंग्लंडची अब्रू सांभाळली तेच एक ब्रिटनचें आशास्थान होतें.

२१७ दिवस ज्या भयंकर परिस्थितीमध्यें मेफिकिंग सांपडलें होतें, त्यांतील प्रत्येक दिवस केवळ 'बी. पीं.'च्या धडाडीवर निभावून नेला जात होता, असें म्हटलें तर अतिशयोक्ति होणार नाहीं. बोअर सैन्याचा खरा पराभव येथेंच झाला; त्यामुळेंच ब्रिटिश सेनेला स्फुरण चढलें आणि पुढील सर्व विजय त्यांना मिळाले. नाहींतरी मन हीच सैनिकाची खरी शक्ति होय.

मेफिकिंगच्या सुयशामुळें ब्रिटिश जनतेनें 'बी.पीं'च्यावर अभिनंदनाचा नुसता वर्षाव केला. साऱ्या ब्रिटनचे डोळे मेफिकिंगच्या जयापजयावर खिळून राहिले होते. आणि विजयामुळें घराघरांतून 'बेडन पावेल' यांचें चित्र मोठ्या मानानें लटकाविलें गेलें. 'बी.पीं'च्या अभिनंदनासाठीं चौकाचौकांमधून सभा झाल्या, मिरवणूकी निघाल्या आणि इंग्लंडच्या कोनाकोपऱ्यांत त्यांचे नांवाची कीर्ति

वाऱ्याप्रमाणें पसरली. 'बी. पी.' आफ्रिकेमध्येंच होते, त्यामुळें त्यांच्या माता व भगिनी यांच्यावरच या अभिनंदानांचा स्वीकार करण्याची पाळी आली.

आफ्रिकेंतील युद्ध सर्वस्वीं संपले नसल्यानें 'बी. पीं'ना तेथून हालतां येणें अशक्य होतें. त्याशिवाय आणखी दुसरी एक जबाबदारी त्यांनीं शिरावर घेतली होती. ती म्हणजे नवीन कवायती सैन्याच्या पलटणी तयार करणें.

केप टाऊनला गाडीनें जात असतांनाच 'बी. पीं.'नीं आफ्रिकेंतील सैन्याबद्दल विचार करून एक योजना तयार केली. त्या योजनेला अधिकाऱ्यांची मान्यता मिळाली व त्याप्रमाणें पांच महिन्यांच्या अवधींत ९०० सैनिकांना घोडदळाचें शिक्षण देऊन त्यांनीं तयार केलें. या सैनिकांमध्यें ५०० बोअरहि होते. सर्व सैनिकांना उत्कृष्ट ऑस्ट्रियन घोडे व गडद रंगाचे गणवेषहि देण्यांत आले. या सर्व कामगिरीबद्दल 'केप'चे हायकमिशनर श्री. मिलर यांनीं 'बी.पीं.'चा मोठा गौरव केला. वरील कामामध्यें व्यग्र असतांनाच सैनिकांसाठीं 'Aids to Scouting' हें पुस्तक 'बी. पीं.'नीं प्रसिद्ध केलें. तें इतकें लोकप्रिय झालें कीं सैन्याबाहेरहि त्याचा विलक्षण खप सुरू झाला. मुलांच्यासाठीं या पुस्तकाचीं प्रकरणें संक्षिप्त रूपांत छापलीं गेलीं.

या अविश्रांत परिश्रमाचा ताण 'बी. पीं.'च्या शरीरास असह्य झाला; आणि म्हणून ते रजा घेऊन इंग्लंडला जाण्यासाठीं निघाले. जातांना वाटेवरच 'साउॅदम्टन' या ठिकाणीं त्यांचा प्रचंड सत्कार झाला. हे सत्कार-समारंभ प्रकृतीच्या दृष्टीनें 'बी. पीं'ना मानवत नव्हते; म्हणून आपल्या आगमनाचा त्यांनीं मुळींसुद्धां गाजावाजा

होऊं दिला नाहीं आणि लंडन शहराच्या जनसमूहाच्या तावडींतून मोठ्या मुष्किलीनें निसटून ते घरीं येऊन पोहोंचले. स्वगृहीं आल्यावर आपल्या प्रेमळ आप्तेष्टांच्या सहवासांत त्यांची प्रकृति लवकरच सुधारली.

यानंतर एक महत्त्वपूर्ण बहुमान त्यांना लाभला; तो म्हणजे इंग्लंडचे बादशहा ७ वे एडवर्ड यांनीं आपल्या 'बाल्मोरल' राजवाड्यामध्यें 'बी. पीं.'ना बोलावून त्यांचा थाटानें सत्कार केला. मॅफिकिंगच्या लढाईचा वृत्तांत त्यांनीं सविस्तर 'बी. पीं.'च्याकडून ऐकला व त्यांच्या इतर सर्व कामगिरीचा परिचय करून घेतला. त्यामुळें त्यांना फार समाधान वाटलें. आपली व्यक्तिशः भेट म्हणून सुंदरसें 'व्हायोलिन' त्यांनीं 'बी पीं.'ना दिलें.

इंग्लंडमधील सुप्रसिद्ध कलावन्त जॉर्ज वॅट्स् आणि हर्कोमर यांनीं 'बी. पीं'ना समोर बसवून घेऊन त्यांचीं चित्रें चितारलीं. हर्कोमर यांना प्लॅस्टरचे पुतळे करण्याची कलाहि चांगलीच अवगत होती. या कलेची सर्व माहिती 'बी. पीं.'नीं त्यांच्याकडून घेतली. अशा प्रकारें इतस्ततः पसरलेले ज्ञानकण वेंचून घेण्याची त्यांची क्षमता विलक्षण होती. पुढें फावल्या वेळीं अनेक पुतळे त्यांनीं स्वतः तयार केले. त्यांतील 'कॅप्टन स्मिथ'चा पुतळा इतका कलापूर्ण व यथार्थ स्वभावदर्शी होता कीं, रॉयल ॲकेडमीच्या प्रदर्शनामध्यें त्याला स्थान देण्यांत आलें होतें.

१९०२ मध्यें आफ्रिकेमध्यें घोडदळाचे इन्स्पेक्टर-जनरल म्हणून 'बी. पीं.'ची नेमणूक झाली. १९०७ पर्यंत या स्थानावर

ते काम करीत होते. या काळामध्यें कॅनडा व इजिप्तमध्यें त्यांनीं दौरा केला. १९०५ मध्यें साम्राज्यांतील घोडदळाबद्दल आपली माहिती, त्यांनीं एक छोटासा ग्रंथ प्रकाशित करून, प्रसिद्ध केली. हें सर्व करीत असतांनाच त्यांचें मन एका महत्त्वपूर्ण गोष्टीचें चिंतन करीत होतें. त्या चिंतनामध्येंच स्काऊट / गाईड चळवळीचीं बीजें रोविलीं होतीं. या बीजांतून एका जागतिक तरुण-संघटनेच्या विशाल वृक्षाची निर्मिति व वाढ कशी झाली तें आपण पुढील प्रकरणांत पाहूं.

—*—

# दुसऱ्या जीवनाची सुरुवात

मेफिकिंगच्या संग्रामानंतर 'बी. पीं'चा दर्जा सैन्यामध्यें वाढत गेला आणि इंग्लंडमध्यें त्यांची लोकप्रियता विलक्षण वाढली; पण ते मेफिकिंगमधील संदेश पोहोंचविण्याचें काम करणाऱ्या त्या वानर-सेनेला—'बाल'वीरांना—विसरले नव्हते. त्या मुलांची कर्तव्यदक्षता, विनयशीलता, बेडरपणा व आनंदी वृत्ति या गोष्टींची छाप 'बी. पीं'च्या मनावर खोलवर पडली होती. त्या मुलांच्या शिक्षणासाठीं त्यांच्या चारित्र्यवर्धनासाठीं वास्तविक कितीसे श्रम मोठ्या माणसांनीं घेतले होते? कांहींच नाहीं! याचा अर्थ 'बी. पीं.'नीं असा लावला कीं, वर उल्लेख केलेले सद्गुण सामान्यत: सर्व मुलांमध्यें असतातच; त्यांचें रक्षण आणि वर्धन मात्र केलें गेलें पाहिजे

'आफ्रिकेंतील एका छोट्याशा गांवामध्यें आणि तोहि केवळ लढाईच्या निमित्तानें—बालवीर पथकाच्या निर्मितीचा जो प्रयोग झाला तो सर्व जगामध्यें व शांततेच्या काळामध्येंसुद्धां करण्यासारखा नाहीं का?' असा विचार 'बी. पीं.'च्या मनामध्यें घोळूं लागला. या प्रश्नाचें उत्तर शोधून काढण्याच्या प्रयत्नास ते लागले. या प्रयत्ना-मध्यें ते दंग असतांना त्यांनीं जें लेखन केलें त्यामुळें तें जगाच्या दृष्टीनें केवळ शूर सेनापति न ठरतां एक थोर शिक्षणतज्ज्ञ, मानस-शास्त्रज्ञ व साहित्यिकहि ठरले. जगाकडून त्यांना 'चीफ स्काउट' ही पदवी बहाल करण्यांत आली. या घटना कशा कशा घडत गेल्या हें पाहाण्यासारखें आहे.

इंग्लंडमध्यें जनरल ॲलनबी नांवाचे एक थोर सेनानी होते. एके दिवशीं आपल्या बंगल्यापुढील बागेमध्यें ते सहल करीत असतां 'बाबा, मीं तुम्हांला गोळी घातली आहे. तुम्ही रानावनांतून हिंडतांना वर, खालीं आणि सगळीकडे नजर द्यायला हवी होती.' हे शब्द मोठ्या मुलायम आवाजांत त्यांच्या कानीं पडले. जनरलनीं वर पाहिलें तों झाडाच्या फांदीवर बसलेला निळ्या डोळ्यांचा त्यांचा छोटा मुलगा मायकेल त्यांना दिसला. त्याच्या या सूचनेंत फार मोठा आशय होता. सूक्ष्म निरीक्षणशक्ति मनुष्याच्या अंगीं असणें किती आवश्यक आहे ह्याचें मुलाकडून बापाला असें शिक्षण मिळालें होतें. जनरल ॲलनबींना कौतुकपूर्ण हंसू आलें. ते म्हणाले, 'होय. मायकेल, खरं आहे तुझं म्हणणें. पण तुझा हा काय खेळ चालला आहे?'

पण या प्रश्नाचें उत्तर देण्यासाठीं मायकेलच्या शिक्षिका कु. लव्हेडे याच अचानक पुढें आल्या. एका झुडुपामागें त्याहि लपल्या होत्या. 'बी. पीं.'नीं लिहिलेल्या 'Aids to Scouting' या पुस्तकांतील वर्णिलेला लपाछपीचा खेळ मायकेलला त्या शिकवीत होत्या. इंग्लंड-मधील कांहीं शिक्षणसंस्थांनीं हें पुस्तक पाठ्यपुस्तक म्हणून स्वीकारलें होतें. ॲलन्बींना ही माहिती समजल्यावर फार आनंद झाला. कारण 'बी. पीं'ची व त्यांची चांगली मैत्री होती; पण 'बी. पीं.'च्या कर्तृत्वपटुतेला शिक्षणशास्त्रज्ञाचा जो पैलू होता त्याचा प्रकाश आतां प्रथमच ॲलनबींना दिसत होता.

सर आर्थर पियर्सन् इंग्लंडमधील एक प्रथितयश पुस्तक-प्रकाशक होते. त्यांनीं 'बी. पीं.'ना मुलांचा एक 'ट्रेनिंग कॅंप'

—शिक्षणासाठीं मेळावा—घेण्याबद्दल सूचना केली. ‘ बी. पीं.’ना ही सूचना अत्यंत पसंत पडली. पियर्सन यांचे एक सेक्रेटरी श्री. एव्हरेट यांनीं अशा मेळाव्याच्या छावणीसाठीं आपण सर्व प्रकारें मदत करूं असें आश्वासन दिलें.

ब्राउन सी. आयलंड हें अगदीं निवांत स्थळ छावणीसाठीं निश्चित करण्यांत आलें. मेळाव्यासाठीं मुलें निवडतांना समाजाच्या सर्व थरांमधून तीं आलेलीं असावींत अशी दृष्टि हेतुपुरःसर ठेवण्यांत आली. कारण हा कँप म्हणजे एक मोठा प्रयोगच होता. एकूण फक्त २५ मुलेंच निवडण्यांत आलीं होतीं.

छावणीमध्यें राहाण्यास आलेलीं तीं मुलें अत्यंत भाग्यवान् म्हटलीं पाहिजेत. निसर्गरम्य वातावरण, नेहमींच्या जीवनापेक्षां भिन्न जीवन, एकमेकांचा प्रेमळ सहवास, आणि ‘ बी. पीं’च्या सारखा कुशल मार्गदर्शक ! आपण जणूं एखाद्या जादूच्या गुहेमध्यें आलों असून ‘ बी. पी. ’ हा जादुगार त्या गुहेंतील आश्चर्यें समजावून देत पुढें पुढें नेत आहे, असें त्या मुलांना वाटलें. या छावणी-मध्यें शेकोटीचे कार्यक्रम होत; त्या वेळीं आपापल्या राहुट्यांमधून बाहेर पडून सारीं मुलें शेकोटीभोंवतीं जमा होत. ‘ बी. पी.’ तेथें त्यांना मनोरंजक गोष्टी सांगत, गाणीं शिकवीत, आरोळ्या (Slogans) शिकवीत. मुलांच्या उत्साहाला पारावार नसे. ‘ उद्यांचा कार्यक्रम ’ जाहीर झाल्यावर ‘ शेकोटी कार्यक्रम ’ संपत असे.

ज्या गोष्टी या शेकोटीभोंवतीं ‘ बी. पीं.’नीं सांगितल्या त्या त्यांनीं लिहून काढल्या. ‘ Scouting For Boys ’ या अजरामर पुस्तकांत आपणास त्या वाचावयास मिळतील. प्रत्येक स्काउट गाईडची ती

'गीता' आहे. ती त्याच्या वाचनांत नित्य धार्मिक निष्ठेनें आली पाहिजे.

'बी. पीं.'नीं लिहिलेलें 'स्काउटिंग फॉर बॉइज्' हें पुस्तक अत्यंत आकर्षक आहे. त्यामध्यें शूरवीरांच्या गोष्टी आहेत. बालवीर-चिन्हा-बद्दल माहिती आहे. पथक उभारावें कसें; त्याची विभागणी वेगवेगळ्या गटांमध्यें कशी करावी, गटासमोर कोणते कार्यक्रम असावे, प्रावीण्यपदकें कशीं मिळवावीं, इत्यादि सर्व माहिती त्यामध्यें आहे. या पुस्तकाची विक्री धूमधडाक्यानें झाली आणि त्या पुस्तकाच्या बालवाचकांचा दररोज 'बी. पीं.'च्या कडे पत्रव्यवहार सुरू झाला. या पत्रांना शक्यतों स्वतःच्या हस्ताक्षरामध्यें उत्तरें लिहिण्याचा 'बी. पी.' प्रयत्न करीत असत. पण पुढें पुढें पत्रांची आवक संख्या एवढी फोंफावली कीं तें अशक्यच होऊं लागलें. अनेकांनीं विचारलेले तेच तेच प्रश्न! त्यांचीं उत्तरें कशीं द्यावीं याचा पेंच त्यांना पडला. शेवटीं १८९८ च्या एप्रिलमध्यें 'Scout' या नांवाचें साप्ताहिक वृत्तपत्रच त्यांनीं सुरू केलें. त्या पाठोपाठ स्काउट शिक्षकांच्यासाठीं 'The Scouter' हें मासिकहि त्यांना काढणें भाग पडलें.

वरील 'स्काउट' व 'स्काउटर' यांचा खपहि प्रारंभापासूनच जोरांत सुरू झाला. बालवाचक अगदीं अधाशाप्रमाणें त्या अंकावर तुटून पडत. गल्लीगल्लीमधून मुलांच्या सभा होऊं लागल्या. सहा सहा मुलांचा संघ तयार करून अशा चार संघांचें पथक तयार होई; आणि स्वयंस्फूर्तीनें बालवीर पथकें 'बी. पीं'च्या पुस्तकांचें वाचन करून कार्य करूं लागत. आरंभीं-आरंभीं स्काउटिंगचा प्रसार कसा झाला हें वाचतांना मौज वाटते. अत्यंत गरिबीची परिस्थिति

असलेल्या मुलांमधूनसुद्धां पथकें निर्माण झालीं. सर्वांची एकत्र वर्गणी जमा करून ' Scout ' चा अंक किंवा पथकासाठीं लागणारें निशाण यांची खरेदी होई. या पथकांचे वननिवासाचे किंवा मेळाव्याचे कार्यक्रम होत व त्यामधून ही चळवळ वाढीला लागे. हळूहळूं परदेशांमधूनहि या चळवळीचा विस्तार होऊं लागला. आफ्रिकेमध्यें केप-टाऊन येथें पहिलें पथक स्थापन झालें. त्या पाठोपाठ ऑस्ट्रेलियामध्यें सिडने येथेंहि पथक स्थापन झाल्याची वातमी आली. ही वाढ इतकी झपाट्यानें झाली कीं अवघ्या १०।१२ वर्षांच्या अवधींत, १९१३ मध्यें फक्त ब्रिटिश साम्राज्यामध्येंच ३२,७५७ स्काऊटस् होते.

१९०९ मध्यें द. आफ्रिकेमध्यें 'बी. पीं'नीं दौरा केला. त्या वेळीं तेथील जनतेमध्यें स्काउटिंगची आवड दिसून आली. ब्राझील, अर्जेंटाईन व चिली येथें पूर्वींच पथकें निघालीं होतीं.

इंग्लंडला परतल्यावर पुन्हां मेळावा घेण्याचें 'बी. पीं.'नीं ठरविलें. या छावणीचें वैशिष्टय हें कीं जमिनीप्रमाणें समुद्रावरहि मेळाव्याचे कार्यक्रम ठेवण्यांत आले होते. हँपशायर परगण्यांतील बॅकलर्स हॉर्ड या ठिकाणीं ही छावणी झाली व सी. बी. फ्राय यांनीं ' मर्क्युरी ' हें जहाज स्काउट-ट्रूप्सना वापरण्यासाठीं दिलें. यामधूनच सागरी-बालवीर विभाग ( Sea Scout Branch ) निर्माण झाला.

१९०९ मध्येंच स्कॉटलंडमध्यें ६००० बालवीरांचा एक मेळावा ग्लासगो या ठिकाणीं झाला. यानंतरची प्रमुख घटना म्हणजे इंग्लंडचे बादशहा ७ वे एडवर्ड यांनीं ' बालमोरल ' या आपल्या स्कॉटलंडमधील राजवाड्यामध्यें ' बी. पीं.'ना बोलावून त्यांचा मोठा

सन्मान केला व त्यांना 'सर' पदवी बहाल केली. स्काउट चळवळ असीम जोमानें सर्व साम्राज्यभर आणि इतरत्रहि वाढत होती; अशा वेळीं तिच्याकडे तर लक्ष्य द्यावयाचें आणि पुन्हां सरकारी नोकरी करायची या दोन्ही गोष्टी साधणें मोठें अवघड होत आहे, ही वस्तुस्थिति 'बी. पीं.'नीं मोठ्या कौशल्यानें बादशहांच्या निदर्शनास आणली. तेव्हां सैन्यामधील नोकरीचा राजीनामा देण्याचा सल्ला बादशहांनीं मोठ्या दूरदर्शीपणानें दिला. त्याबद्दल 'बी. पीं. 'ना जन्मभर कृतज्ञता वाटत होती. याच प्रसंगीं एखाद्या स्काउट-रॅलीला स्वत: उपस्थित राहाण्यास व विशेष प्रावीण्य दाखविणाऱ्या स्काउटस्ना "किंग्ज स्काउटस्" म्हणण्यासहि बादशहांनीं रुकार दिला.

पुढें लवकरच म्हणजे ४ सप्टेंबर रोजीं क्रिस्टल पॅलेसनजीकच्या मैदानावर ११,००० स्काउटस्ची प्रचंड रॅली झाली. तिच्यामध्यें एक गोष्ट संस्मरणीय अशी घडली. ती म्हणजे मुलांच्या बरोबरीनें खाकी गणवेशांत मुलींचा एक छोटासा ताफा तेथें कोपऱ्यांत उभा होता. ही गोष्ट 'बी. पीं.'ना अनपेक्षित होती. ते मोठ्या कुतूहलानें तेथें गेले. कारण मुलींना त्यांनीं स्काउटिंगमध्यें भाग घेण्यासाठीं कधींच पाचारण केलें नव्हतें. 'तुम्ही कोठल्या मुली? येथें कां आलांत?' असा प्रश्न 'बी. पीं.'नीं विचारतांच एक धिटुकली मुलगी पुढें सरसावली आणि म्हणाली, 'आम्ही गर्ल-स्काउटस् आहोंत. आम्हांलाहि या मुलांप्रमाणें स्काउट-चळवळींत सामील व्हायचंय.'

—'बरं.... बरं. पाहूं तुमचं काय करायचं तें....' एवढेच उद्गार काढून 'बी. पी.' तेथून निसटले. पण मुलींनीं आपला हक्क येथपासून गाजविण्यास सुरुवात केली आणि आज 'स्काउटस् 'च्या जोडीनेंच

'गाईडस्'हि चळवळीमध्यें भाग घेत आहेत ही त्यांना अभिमानाची गोष्ट आहे.

'गाईड' चळवळीची सुरुवात क्रिस्टल पॅलेस रॅलीचे वेळीं वरील प्रकारें झाली.

३१ मे १९१० रोजीं एक महत्त्वपूर्ण घटना 'बी. पीं'नीं आपल्या आयुष्यांत केली. ती म्हणजे त्यांनीं सुरू केलेल्या चळवळीच्या रक्षणार्थ आपल्या दरमहा हजारों रुपये घरीं आणणाऱ्या अशा नोकरीचा त्यांनीं राजीनामा दिला. लॉर्ड हाल्डेन यांनीं नाइलाजानें व खेदानेंच त्याचा स्वीकार केला. आणि आपल्या सर्व शक्ति पणाला लावून आपलें प्रिय काम करण्यास 'बी. पी.' मोकळे झाले!

यानंतर 'बी. पीं.'नीं अमेरिकेचा दौरा केला. तेथें स्काउटिंगची चळवळ पूर्वींच सुरू झाली होती हें 'बी. पीं.'ना ठाऊक होतें. पण या चळवळीचा तेथील जोम व पसारा पाहून स्वतः संस्थापक सुद्धां चकित झाले. हजारों स्काउटस्‌नीं 'बी. पीं.'ना मानवंदना दिली.

अमेरिकेंत 'स्काउटिंग'चा प्रवेश होण्याचें कारण मोठें गंमतीदार आहे. त्याचें असें झालें. एके दिवशीं सकाळीं लंडन शहरामध्यें खूपच धुकें पडलें होतें. त्यामुळें पायाखालची वाटसुद्धां दिसत नव्हती, मग दुकानांच्या पाट्या दिसण्याचें नांवच नको. अशा वेळीं एक गृहस्थ मोठ्या चिंतातुर नजरेनें रस्त्याकडेला एका झाडास टेकून उभे होते. या गृहस्थांना एका ठिकाणीं अत्यंत जरुरीच्या कामासाठीं जावयाचें होतें. मधून मधून घड्याळाकडे ते नजर टाकीत

आणि सुस्कारे सोडीत. याच वेळीं एक १०–१२ वर्षांचा मुलगा शेजारून चालला होता. त्याची नजर त्या गृहस्थांकडे गेली. तो जवळ आला व म्हणाला, "आपणांस वाट सांपडत नाहीं का? मी आपणांस मदत करूं का?" त्या मुलाचे हे गोड शब्द ऐकून त्या गृहस्थांना फार आनंद वाटला. त्या मुलाला काय माहीत हे अमेरिकेंतील प्रख्यात पुस्तक-प्रकाशक मि. विल्यम बॉईस आहेत म्हणून! त्यानें त्यांचें बोट पकडलें आणि त्यांना इच्छित स्थळीं नेलें. मि. विल्यम खुष झाले व त्या मुलाला बक्षिसी देऊं लागले. पण तो मुलगा नम्रतेनें म्हणाला, "क्षमा करा मला, आपली भेट मी स्वीकारूं शकत नाहीं. मी स्काउट आहें आणि सत्कृत्य करणें हें माझें कर्तव्यच आहे."

"ऑं....स्काउट!....म्हणजे काय बुवा?" मि. विल्यम उद्गारले.

"आपणास त्याची माहिती पाहिजे असेल तर आपलें काम झाल्यावर माझेबरोबर चला. येथें जवळच आमची स्काउट कचेरी आहे."

त्या मुलाच्या गोड वर्तनानें विल्यम इतके आकर्षित झाले होते कीं त्यांनीं स्काउट कचेरीला भेट दिली. त्यांना तेथील अधिकाऱ्यां-पाशीं पोहोंचवून आणि 'नमस्ते' करून तो मुलगा तेथून निघून गेला. आपलें नांव सुद्धां त्यानें विल्यमनां सांगितलें नाहीं!

स्काउट कचेरींतील सर्व वातावरण, तेथील कामाची पद्धति या सर्व गोष्टींचा मि. विल्यम यांच्या मनावर इतका सुपरिणाम झाला कीं, अमेरिकेंत परततांना स्काउट-चळवळीचीं बीजें ते बरोबर घेऊन गेले, आणि त्या बीजांपासून या चळवळीचा प्रचंड विस्तार झाला.

पण ‘ अप्रत्यक्ष चालक ’ असा तो मुलगा मात्र कायमचा ‘ अज्ञात ’ राहिला.

४ जुलै १९११ ला स्काउट चळवळीनें आपल्या जीवनांतील एक नवीन पान उघडलें. या दिवशीं विंडसर पार्कमध्यें झालेल्या मेळाव्याची घटना स्काउट चळवळीच्या इतिहासामध्यें सुवर्णाक्षरांनीं नोंदविली जाईल. इंग्लंडचे बादशहा पंचम जॉर्ज हे मेळाव्यास भेट देण्यास आले होते. शिस्तींत वागणाऱ्या तीस हजार मुलांना पाहून त्यांना अत्यंत आनंद वाटला. मार्चपास्टचा कार्यक्रम झाला. ब्रिटनच्या सम्राटांनीं ‘ बी. पीं. ’ना धन्यवाद दिले आणि बालवीरांची पाठ थोपटली. त्या वेळीं स्काउटस्‌नीं केलेल्या उत्स्फूर्त आरोळ्यांनीं आणि टाळ्यांच्या कडकडाटांनीं आकाश दुमदुमून गेलें ! ‘बी.पीं.’ची सुप्त इच्छा आज फळाला आली होती. त्यांचें स्वप्न साकार झालें होतें.

—❀—

# विवाह आणि स्काउटिंगचा प्रसार

"सुखी जीवन जगण्यासाठीं नेमकी कोणती गोष्ट करणें आवश्यक आहे, हें अगदीं थोडक्यांत सांगाल काय?" असा प्रश्न एकदां 'बी. पीं.'च्या मित्रांनीं त्यांना केला. त्या वेळीं मिष्किलपणें हंसत आणि डोळे मिचकावीत ते म्हणाले, "सुखद विवाह हीच ती गोष्ट." क्षणभर थांबून ते पुन्हां म्हणाले, "खरोखरच विवाहामुळें जर मन-मिळाऊ जीवनसाथी मिळाला तर कष्टमय जीवनाची खंत वाटत नाहीं, याचा मला आयुष्यभर अनुभव आला आहे."

—'बी. पीं.'च्या पत्नी ओलेव्ह बेडन पॉवेल यांनाच या उद्गाराचें सारें श्रेय आहे. त्यांचें मूळ नांव ओलेव्ह सोम्स. क्रॅमबॉर्न या गांवांतील हॅरॉल्ड सोम्स यांच्या त्या कन्या. १९१२ मध्यें वेस्ट इंडीजकडे आपल्या पित्यासह त्या जलपर्यटनास निघाल्या असतां 'बी. पीं.'चीं व त्यांची ओळख झाली. एकाच जहाजावरून त्यांचें पर्यटन सुरू होतें. जहाज जेथें थांबेल तेथें शेकडों स्काउटस् येत आणि 'बी.पीं.'च्या स्वागताचा कार्यक्रम होई. ओव्हेल सोम्स अत्यंत आदरानें 'मेफिकिंगच्या वीरा'कडे त्या वेळीं पाहात असत.

एक दिवस डेकवर त्या असतां 'बी. पीं.'नीं त्यांना पाहिलें. त्यांच्या पूर्वस्मृति जागृत झाल्या. 'या मुलीला आपण पूर्वीं कधींतरी पाहिलें आहे' असें त्यांना वाटलें. होय, लंडन शहरामध्यें गर्दींतून वाट काढीत असणारी ओलेव्ह सोम्स यांची पाठमोरी आकृति त्यांनीं पाहिली होती. कां कुणास ठाऊक, त्यांच्या स्मृतिपटलावर ती

आकृति कायम रेखाटली गेली होती. 'बी. पीं.'नीं निर्भयपणें ओलेव्ह सोम्स यांची मुलाखत घेतली. हळूहळूं ओळखीचें रूपांतर स्नेहामध्यें होऊं लागलें. आणि ओलेव्हनें आपल्या पित्यास 'ती' गोष्ट सांगितली. इतकेंच नव्हे तर आपल्या आईला पत्र पाठवून 'बी.पीं.'-बद्दलच्या आपल्या भावना कळविल्या. 'बी. पीं.'नीं काढलेलीं सुंदर चित्रें ओलेव्ह टक लावून पाहात. प्रवास संपण्याचे वेळीं त्या दोघांनीं विवाहबद्ध व्हावयाचें निश्चित केलें.

यानंतर 'बी. पी.' आस्ट्रेलिया, जपान वगैरे देशांचा आपला दूरचा दौरा संपवून इंग्लंडला परत आले आणि मग अधिकृत रीतीनें आपल्या विवाहासंबंधींची वार्ता त्यांनीं जाहीर केली. ऑलेव्ह सोम्स आतां ऑलेव्ह बेडन पॉवेल झाल्या ! या वार्तेनें 'बी. पीं.'च्यावर अभिनंदनाचा वर्षाव झाला. इंग्लंडमधील स्काउटस्‌नीं केवळ 'गिनी-गिनी' जमा करून फंड उभारला आणि सुंदरशी मोटारगाडी त्यांना भेट म्हणून अर्पण करण्यांत आली. मुलांचें आपल्यावरील प्रेम पाहून 'बी. पीं.'च्या डोळ्यांत आनंदाश्रु उभे राहिले. या मंगल विवाहानंतर 'बी. पीं.'चें खाजगी जीवन अत्यंत संपन्न झालें. पीटर हा मुलगा व हीदर व बेट्टी या दोन कन्या, अशीं तीन अपत्यें त्यांना झालीं. 'बी. पीं'ची आर्थिक, मानसिक व शारीरिक काळजी घेण्याचें काम मिसेस् ओलेव्ह यांनीं सर्वतोपरी उचललें. त्यांचें जीवन 'बी. पीं.'च्या जीवनप्रवाहांत मिसळलें, पण लुप्त झालें नाहीं; कारण 'जगाच्या चीफ गाईड' या नात्यानें जगांतील युवतींपुढें त्या उभ्या राहिल्या आणि 'बी. पीं.'च्या हातांत हात घालून त्यांनींहि गाईड चळवळीचें नेतृत्व केलें. 'बी. पीं.'च्या पश्चात् त्या आज हयात

आहेत. आपल्या जगन्मान्य पतीच्या स्मृती मनांत ठेवून त्या आजहि गाईड चळवळीच्या आधारभूत बनल्या आहेत. त्यांच्या कार्यामध्यें खंड पडलेला नाहीं आणि म्हणूनच त्यांना मिळालेला सर्वोच्च मानाचा ' रौप्य मत्स्य ' त्यांच्या गळ्यामध्यें शोभून दिसतो.

स्काउट चळवळीमध्यें मुलांना किती विविध प्रकारचें शिक्षण मिळतें याची लोकांना चांगल्या रीतीनें कल्पना यावी आणि त्याचें महत्त्व पटावें यासाठीं 'बी. पीं.'नीं अतिशय कुशलतेनें प्रचार केला. बर्मिंगहॅम या प्रचंड उद्योगकेंद्रामध्यें त्यांनीं घेतलेला स्काउट गाईड मेळावा हें त्या प्रचाराचें उदाहरण मानतां येईल.

या मेळाव्यामध्यें अनेक प्रकारचीं प्रात्यक्षिकें करून दाखविण्यांत आलीं. कांतडी पट्टे तयार करणें, बूट रिपेअर करणें, बुक-बाईंडिंग करणें, खेळणीं तयार करणें यासारख्या गोष्टींपासून प्रथमोपचार, संदेशनापर्यंत (Signalling) सर्व प्रकार तेथें दाखविण्यांत आले. तेथील कामगारबंधूंना या सर्व गोष्टींबद्दल फारच आकर्षण वाटलें. ज्या मुलांनीं आपल्या अंगीं असलेल्या विशिष्ट कसबाचा चांगला विकास केला असेल त्यांना प्रावीण्यपदकें बहाल करण्याची कल्पना 'बी. पीं.'नीं काढली. पाकशास्त्र, शिवणकाम, विणकाम, चित्रकला इ. अनेक गोष्टींतील प्रावीण्याबद्दल हीं पदकें मुलांना स्काउट संस्थेतर्फे आजहि दिलीं जातात. कारण सर्व कलांच्या विकासासाठीं त्यांच्यायोगें चांगलेंच उत्तेजन मिळतें. स्वतः 'बी.पी.' सर्व कलांत वाकबगार होते. त्यांना चित्रकलेचें तर विशेष वेड होतें याचा मागें उल्लेख आलाच आहे. पण मुलांच्यांत ही आवड पसरविण्यासाठीं ते नाताळसारख्या प्रसंगीं स्वतः चित्रें काढून भेटकार्डें

पाठवींत व मुलांना स्वतःच्या कलेचा अभिमान राखण्याचें व विकास साधण्याचें, आपण, अशाप्रकारें उदाहरण घालून देत. अशा भेट-कार्डांचे कांहीं नमुने ' साधेपणांतील सौन्दर्य,' ( simple but sweet ) म्हणून पाहण्यासारखे आहेत.




१९१४ सालीं अगदीं लहान मुलांसाठीं ' वुल्फ कब् ' ही नवीन शाखा सुरू करण्यांत आली. ७ वर्षांपासून ११ वर्षांपर्यंतच्या मुलांना यामध्यें भाग घेतां येतो. मुलांच्या वयाचा विचार करून त्यांच्यासाठीं आंखलेले कार्यक्रम इतके आकर्षक असतात कीं त्यामुळें स्काउट चळवळीबद्दल जन्मभर त्यांना आस्था वाटूं शकते. लहान मुलांना ' बी. पी.' ' कोल्हा ' या नांवानें संबोधीत असत. त्यांचें वंदन दोन बोटांचें असतें. कोल्ह्याच्या कानाप्रमाणें तें दिसतें.




लहान मुलांना ओरडाओरडीचे खेळ सहजच आवडतात. 'कब'ना देण्यांत आलेली आरोळी पहा.

"Dyb Dyb Dyb...."

"We'll Dob Dob Dob."

याचा अर्थ– “Do your best”

“We will do our best.” असा आहे.

अशा प्रकारें विविध प्रकारच्या कार्यक्रमांची रचना ‘कब चळवळी’साठीं करण्यांत ‘बी. पी.’ गुंतले असतांनाच एक आकस्मिक संकट उभें ठाकलें. तें म्हणजे १९१४ चें पहिलें जागतिक महायुद्ध. या युद्धांत इंग्लंडवर मोठी आणिबाणीची परिस्थिति कोसळली. राष्ट्राच्या हांकेस ‘ओ’ देणें कर्तव्यच होतें. इंग्लंडचे कमांडर-इन्-चीफ लॉर्ड किचनेर यांच्या सल्ल्यानुसार ‘बी. पी.’ स्वतः लष्करांत सामील झाले नाहींत. पण हजारों स्काउट गाईडस्‌ना त्यांनीं देश-सेवेसाठीं मार्गदर्शन केलें. इंग्लंडमध्यें स्थायिक झालेल्या जर्मन नागरिकांच्या हालचालींवर लक्ष ठेवणें, वाहतुकीसाठीं रस्त्यांचें निरीक्षण करणें, ऑफिसांतून, पोस्टांतून जेथें जेथें माणसांची तूट असेल ती भरून काढणें, यांसारखीं कामें स्काउट्स्‌नीं केलीं तर गाईड्सनीं रुग्णसेवेची अत्यंत बहुमोल कामगिरी हॉस्पिटल्समधून केली. कारखान्यामध्यें स्त्रिया कामासाठीं गेल्या असतां त्यांचीं मुलें सांभाळण्याचें कामहि अत्यंत आपुलकीनें त्यांनीं केलें. त्यामुळें हजारों स्त्रिया निश्चितपणें कारखान्यामध्यें कामास जाऊं शकल्या व तेथील पुरुषवर्ग लष्करांत सामील होऊं शकला.

या युद्धकालांत १३ ऑक्टोबर १९१४ ला ‘बी. पीं.’च्या मातोश्री स्वर्गवासी झाल्या. ‘बी. पी.’ अत्यंत निष्ठावन्त मातृभक्त होते; तरी त्यांनीं या वैयक्तिक दुःखानें प्राप्त कर्तव्याकडे दुर्लक्ष केलें नाहीं. आपल्या पुढील कर्तव्याची जाणीव ठेवून त्यांनीं स्काउटस्‌ना सतत

मार्गदर्शन केलें. आईनें आपल्या जीवनांतील उत्कर्षकाल व सुखी संसाराची सुरुवात पाहून मग डोळे मिटले याबद्दल 'बी. पीं.'ना समाधान वाटलें.

१९१८ सालीं इंग्लंडला विजय मिळाला आणि युद्धहि एकदांचें संपलें. त्या वेळेसच 'बी. पीं.'नीं आपलें वसतिस्थान हॅंपशायरमधील एक निसर्ग-रम्य ठिकाणीं केलें. या घराचें नांव त्यांनीं 'पॅक्स-हिल' म्हणजे 'शांतिस्थान' असें ठेवलें. 'बी. पीं.'ना 'पायपर ऑफ दि पॅक्स' म्हणतात तें यामुळेंच.

'बी. पीं.'ना बागकामाची आवड होती. त्यांनीं आपल्या घरासमोर लहानच पण सुंदरशी बाग केली होती. लेखनासाठीं आपलें टेबल ते कधीं कधीं बागेंतच ठेवीत. दूरदूरच्या शेकडों व्यक्ति त्यांना भेटावयास येत. त्यांचा आदर-सत्कार करणें हें काम 'बी. पीं.'च्या पत्नी आत्मीयतेनें करीत आणि स्वतः सुद्धां गाईड कार्याच्या नेत्या म्हणून संभाषणांत भाग घेत.

संध्याकाळीं 'बी. पीं.'ची गोजिरवाणी मुलें त्यांच्या अंगाखांद्यावर खेळत त्या वेळीं ते मनमुराद हंसत आणि मुलांनाहि हंसवीत. आपल्या कुटुंबियांसह बरोबर भरपूर फराळाचे जिन्नस घेऊन सहलीला जाण्यांत त्यांना स्वर्गसुख वाटे.

थोडक्यांत असें म्हणतां येईल कीं सुखी जीवन कसें जगावें हें 'बी. पीं.'च्यापासून शिकावें. योजनाबद्ध जीवन, अविश्रांत परिश्रम आणि नेहमीं हंसतमुख असणें या तीन गोष्टी त्यांच्या जीवनांत सतत आढळून येतात.

—*—

# तुफानी प्रचार-जगाची मान्यता

युद्ध सुरू असतां स्काउट संस्थेला परराष्ट्रांतील आपलें प्रचारकार्य कांहीं काळ स्थगित करावें लागलें होतें. पण त्यानंतर सर्वत्र जोमानें कामाला लागण्यासाठीं १९२० सालीं सर्वराष्ट्रीय मेळावा घेण्याची कल्पना निघाली. ऑलिंपिया या ठिकाणीं हा प्रचंड मेळावा झाला. मेळावा संपतांना 'बी. पीं.'नीं जें भाषण केलें तें अत्यंत स्फूर्तिशाली होतें. ते म्हणाले, 'बंधूंनो आणि भगिनींनो इतक्या प्रचंड संख्येनें तुम्ही एकत्र आलांत, सहजीवनाचा मनमुराद लाभ घेतलांत, चर्चा केलीत, एकमेकांचे विचारहि समजावून घेतलेत. आतां परत जातांना विश्वबंधुत्वाची कल्पना चित्तांत धरून जाणार ना? सौख्य, शांति व समृद्धीसाठीं सतत झटणार ना?'

तेथें जमलेल्या जमावानें 'बी. पीं.च्या या वाक्याचें स्वागत प्रचंड होकारार्थी गर्जनेनें केलें. टाळ्यांचा गगनभेदी कडकडाट झाला. भाषणानंतर एक उत्स्फूर्त व अनपेक्षित असा दुसरा एक कार्यक्रम झाला. तेथें जमलेल्या सर्वांनीं एकमतानें "चीफ स्काउट ऑफ दि वर्ल्ड" ही नवी पदवी 'बी. पीं.'ना बहाल केली.

—'बी. पीं.'च्या यानंतरच्या जीवनांत त्यांच्यावर पदव्यांची व सन्मानांची खैरात झाली: पण चीफ स्काउट हीच पदवी त्यांना सर्वश्रेष्ठ वाटली. कारण त्यांच्या लाडक्या तरुण मित्रांनीं आणि मुलांमुलींनीं त्यांना ती दिली होती.

१९२१ सालीं हिंदुस्तानचे व्हॉइसरॉय लॉर्ड चेम्सफर्ड यांच्या निमंत्रणावरून 'बी. पीं'नीं हिंदुस्तानला भेट दिली. मुंबईला

त्यांचा पहिला मुक्काम झाला. तेथें 'बी. पी.' व त्यांच्या पत्नी यांच्या सन्मानार्थ मेळावा भरविण्यांत आला होता. सर्वश्रेष्ठ स्काउट नेल्यावर सुगंधी फुलांचा व गुलाबजलाचा वर्षाव करण्यांत आला. 'बी. पीं.'च्या पुढील सर्व प्रवासासाठीं आगगाडीचा एक खास जादा डबा मुद्दाम तयार ठेवण्यांत आला होता. 'बी. पीं.'चें प्रवासांतील घरच होतें तें; कारण त्यामध्यें सर्व प्रकारच्या सुखसोयी केलेल्या होत्या.

हजारों मैलांचा प्रवास करून 'बी. पीं.'नीं हिंदुस्तानांतील स्काउट-कार्याची पहाणी केली. सर्व दिवस कार्यक्रमांत व रात्री प्रवासांत जात, पण त्या वेळींहि स्वागतार्थ लोक स्टेशनवर येत आणि जागरण घडे. पण 'बी. पीं.'नीं त्याबद्दल यत्किंचितहि कुरकुर केली नाहीं. उलट या सर्व वेळीं ते अत्यंत, आनंदी राहात.

मद्रास येथें स्काउट-अधिकाऱ्यांची बैठक भरून अखिल भारतीय स्वरूपाची स्काउट-संस्था निर्माण करण्याचा निश्चय करण्यांत आला.

भारतांतील आपला दौरा संपवून 'बी. पी.' ब्रह्मदेशांत गेले व तेथील स्काउट-संस्थेला मार्गदर्शन करून ते मायदेशीं परत गेले.

१९२२ सालीं जिनीव्हा येथें जागतिक शिक्षण परिषद् झाली. त्या वेळीं 'बी. पीं.'ना मुद्दाम पाचारण करण्यांत आलें होतें, कारण त्यांचें कार्य आतां विश्वमान्य झालें होतें. "नीतिशिक्षण" या विषयावर 'बी. पीं.'नीं अत्यंत तळमळीनें भाषण केलें. त्यांचें मूलगामी विचार ऐकून थोर थोर शिक्षणतज्ज्ञांनींहि माना डोलविल्या. ज्या गृहस्थाचें स्वतःचें शिक्षण पदवी परीक्षेइतकें सुद्धां झालें

झालें नव्हतें त्यांनीं शिक्षण परिषदेला मार्गदर्शन करावें, ही केवढी आश्चर्यजनक गोष्ट आहे. नाहीं का ?

१९२४ सालीं वेंब्ले (इंग्लंडांतील एक जिल्ह्याचें ठिकाण) येथें जागतिक औद्योगिक-प्रदर्शन होतें. त्या वेळीं स्काउट–जांबुरीहि भरविण्यांत आली. मुंबईतर्फेंहि एक पथक या कार्यक्रमासाठीं गेलें होतें.

१९२६–२७ सालीं द. आफ्रिकेचा दौरा करून 'बी. पी.' परत आले तेव्हां बादशहांनीं त्यांना G. C. M. G. ही सन्मानाची पदवी दिली.

१९२७ ते ३७ या काळांत 'बी. पीं.'नीं स्काउटिंगचा तुफानी प्रचार केला. १९२९ सालीं ॲरो पार्क येथें एक संस्मरणीय असा मेळावाहि झाला. मानवी जीवनांतील असें एकहि क्षेत्र नसावें कीं जेथें स्काउट चळवळीचें कार्य नाहीं. जीं मुलें बुद्धीनें मागासलेलीं आहेत, अपंग आहेत अशांचाहि समावेश 'बी. पीं.'नीं आपल्या चळवळींत करून घेतला. आंधळी व बहिरी मुलें पाहून त्यांचें अंतःकरण कळवळून येत असे. अशा मुलांसाठीं स्काउट शिक्षणाची विशिष्ट पद्धति व अभ्यासक्रमहि तयार करण्यांत आला. अशा प्रकारच्या आपल्या सत्कृत्यामुळें 'बी. पीं.'नीं दीनदुबळ्या मुलांना दिलासा देऊन प्रेमानें त्यांची पाठ थोपटली.

वर्षें भराभर चाललीं होतीं. 'बी. पीं.'चीं मुलें आतां मोठीं होऊन आपल्या स्वतंत्र जीवनक्रमाच्या आंखणीस लागलीं होतीं. पीटरनें १९३४ सालीं सैन्यांत प्रवेश केला व तो द. ऱ्होडेशियामध्यें कामगिरीवर गेला. १९३७ सालीं ज्येष्ठ कन्या बेट्टी हिचा विवाह

आफ्रिकेंत स्थायिक झालेल्या जर्व्हिस क्रे यांच्याबरोबर झाला. पत्नी व एक कन्या हीदर एवढीच मंडळी 'बी. पीं.'च्या कुटुंबांत राहिली. 'बी. पीं.'चें वय आतां ८० च्या आसपास होतें. वार्धक्यानें त्यांच्या शरीरावर अंमल बसविण्यास सुरुवात केली होती. पण त्यांचें तरुण मन त्यांना कुठें स्वस्थ बसूं देत होतें ?

१९३७ सालीं दिल्ली येथें अखिल भारतीय स्वरूपाचा स्काउट-गाईड मेळावा होणार असल्याची बातमी आली व 'बी. पीं.'ना खास निमंत्रण आलें. त्यानुसार पत्नी व कन्या यांच्यासमवेत त्यांनीं हिंदुस्तानची पुन्हां एक वेळ वारी केली. दिल्लीला चार हजार स्काउटस् मेळाव्यासाठीं एकत्र आले होते. धर्म, जाति, प्रांतनिहाय बदलणाऱ्या चालीरीति इत्यादींत विलक्षण विविधता असल्याबद्दल भारताची प्रसिद्धीच आहे. पण अशाहि परिस्थितींमध्यें हजारों तरुणतरुणी एकत्र येऊन, एकाच ध्येयानें प्रेरित होऊन कार्य करीत आहेत हें पाहून 'बी. पीं.'ना समाधान वाटलें. करमणुकीच्या कार्यक्रमामध्यें ढोल-वादन हा कार्यक्रमहि होता. तो त्यांना फारच आवडला.

रिसालपूर या ठिकाणीं १३ वी हुझार पलटण होती. पलटणीचे माजी अधिकारी म्हणून 'बी. पीं.'ना या पलटणीबद्दल आत्मीयता वाटे. ते मुद्दाम रिसालपूर येथें गेले; तेव्हां त्यांच्या सन्मानार्थ परेडचा कार्यक्रम झाला. योगायोगाची गोष्ट अशी कीं, त्याच दिवशीं 'बी. पीं.'चा ८० वा वाढदिवस होता.

हिंदुस्तानांतून परत इंग्लंडला जातांना त्यांचा प्रवास अत्यंत सुखद असा झाला. प्रत्येक बंदरावर स्वागतासाठीं स्काउट-गाईड्स्

येत. त्या वेळीं आपल्या पत्नींना ते म्हणत, 'हजारों मुलांचे आई वडील आपण आतां झालों आहोंत, नाहीं का?'

'बी. पी.' परतेल त्या वेळीं बादशाह सहावे जॉर्ज यांच्या राज्यारोहण समारंभाची धामधूम सुरू होती. या समारंभाला उपस्थित राहाण्याचें सद्भाग्य त्यांना लाभलें. नव्या सम्राटांनाहि इंग्लंडच्या या सुपुत्राच्या कामगिरीबद्दल आदर होता. त्यांनीं 'ऑर्डर ऑफ मेरिट्' हा अतिशय दुर्लभ किताब 'बी. पीं.'ना दिला व त्यांचा गौरव केला.

'बी. पी.' आतां अधिकच थकत चालले होते, पण त्यांनीं सुरू केलेली चळवळ सर्व जगांत फोंफावत चालली होती. हॉलंडमध्यें १९३७ च्या ऑगस्ट महिन्यामध्यें २८,००० स्काऊट-गाईडस्‌चा मेळावा झाला. त्यासाठीं ३१ देशांतून प्रतिनिधि आले होते. ज्या विभागांत मेळावा होता त्याचें नांव 'फुलांची दरी' आणि ठिकाणाचें नांव होतें 'पक्ष्यांचें गीत.' अशा सुरम्य ठिकाणीं हा कार्यक्रम सुरू होता. पण 'बी. पीं.'च्या मनांत कालवाकालव सुरू होती. कारण युरोपमध्यें हळूहळू पण निश्चितपणें युद्धाचे ढग जमा होत होते. कारस्थानांना ऊत आला होता. परिस्थिति स्फोटक बनत चालली होती. आणि दुसरी गोष्ट म्हणजे स्वतःच्या वार्धक्या-मुळे पुन्हां असें एकत्रित येण्याचा योग कधीं येईल असें त्यांना वाटत नव्हतें. समारोपाच्या भाषणांत ते म्हणाले, 'मी आतां चांगलाच बुड्ढा झालों आहें. बोलावणें केव्हां येईल तें सांगवत नाहीं. तुम्ही सारे जवान आहांत. आतां कुठें जीवनाच्या उंबरठ्यावर आहांत. चला. जोमानें पुढें चला. तुमच्या जीवनांत सतत आनंद व समृद्धि भरून राहो.'

—'बी. पीं'च्या भाषणांत निराशा व दुःख केव्हांच नसे. यालाच म्हणावें नेतृत्व !

१९३७ साल त्यांच्या जीवनांतलें अविश्रांत धडपडीचें वर्ष ठरूं शकेल. त्यानंतर मात्र शरीर, मानसिक उत्साहाला साथ करूं शकेना. आफ्रिकेमध्यें जाऊन शांतपणें शेवटचे दिवस घालवावे, असें त्यांच्या मनांत आलें. आफ्रिका खंडावर 'बी. पीं.'चें फार प्रेम. तेथील हिरवेगार डोंगर, गर्द निळें आकाश, आणि प्रशांत सरोवरें यांबद्दल त्यांना नेहमींच आकर्षण वाटे. "आफ्रिका जगाच्या मध्यावर आहे. तेथून सर्व जगाला मी अधिक जवळ राहीन." असा त्यांनीं आपल्या एका नाताळ भेट कार्डावर उल्लेख केला आहे. पीटर व बेट्टी यांचें वास्तव्यहि आफ्रिकेंत असल्यामुळें 'बी. पीं.'चा तेथें जाण्याचा विचार पक्का झाला व १९३८ सालीं आपल्या मित्रमंडळींचा प्रेमाचा निरोप घेऊन ते केनियाकडे जाण्यास निघाले

—*—

# अखेरचे दिवस व अंतिम संदेश

आठवडाभर सक्त मेहनत केल्यावर रविवारच्या विश्रांतीचें सुख आपण उपभोगूं तरच त्याला एक महान् अर्थ असतो. ८० वर्षांपर्यंत सतत धर्मरत राहून आयुष्यांतील खरी विश्रांति आतां मात्र घ्यावयाची असें 'बी. पीं.'नीं ठरविलें. त्यांच्या जीवनांतील सर्वच कार्यक्रम पूर्वनियोजित असत. पूर्वयोजनेमुळें कोठेंहि त्रासिकपणा किंवा अविचार होत नाहीं. उलट समाधान व सुख त्यांतून मिळतें.

या विश्रांतीच्या वास्तव्यासाठीं केनियांतील नैरी हें ठिकाण त्यांनीं पसंत केलें आणि तेथें एका छोट्याशा बंगल्यामध्यें ते राहिले. हा बंगला इतका लहान होता कीं, त्याला "पॅक्स टू" हें नांव त्यांनीं दिलें. एकांतवासांत व निसर्गसांनिध्यांत राहाण्याची 'बी. पीं.'ची आवड या ठिकाणीं पुरी झाली. बंगल्याच्या चारी बाजूंस प्रशस्त बाग होती. त्यामध्यें विविध प्रकारचीं फुलझाडें होतीं. गुलाबाच्या ताटव्यावर टपोरी गुलाबी फुलें फुलत आणि वाऱ्याबरोबर त्यांचा सुगंध खोलींत येई. खोलीचीं दारेंसुद्धां कांचेचीं होतीं, त्यामुळें भरपूर सूर्यप्रकाश आंत येई व बाहेरील निसर्गरम्य दृश्य झोपल्या जागेवरून 'बी. पी.' पाहूं शकत. केनियांतील डोंगर शिखरें सूर्यप्रकाशांत न्हाऊन निघालेलीं ते पाहात. डेलिया, झेनिया, कॉसमस यासारख्या विविध आकर्षक रंगाच्या फुलांनीं बाग बहरून जाई व फुलपांखरें तेथें गोळा होत. भुंग्यांचें गुंजन सुरू होई. —मग मात्र 'बी. पीं.'च्यांतील चित्रकार जागा होत असे व आपले रंगाचे कुंचले ते बाहेर काढीत.

इतक्या वृद्धापकाळींहि त्यांची लेखनाची आवड कमी झाली नव्हती. या काळांतच तीन सचित्र पुस्तकें त्यांनीं प्रकाशित केलीं. यावरून त्यांच्या तरुण मनाची व चैतन्यपूर्ण जीवनाची कल्पना येऊं शकेल.

पत्नीचा सुखद सहवास या काळामध्यें त्यांना लाभला. 'बी.पीं.'च्या पत्नी त्यांच्या स्फूर्तिस्थान बनल्या होत्या. त्या मोठ्या आवडीनें आपल्या पतीच्या प्रत्येक कार्यामध्यें लक्ष घालीत. 'बी. पीं.'नीं आपलें एक पुस्तक त्यांना अर्पण केलें आहे. त्यांत आपल्या मनांत असलेल्या पत्नीविषयींच्या कृतज्ञता बुद्धीस शब्दद्वारें प्रगट केलें आहे.

—आतां 'बी. पी.' आजोबा झाले होते. बेट्टी यांचीं मुलें आजी-आजोबांच्या घरीं येत त्या वेळीं त्यांच्या आनंदाला पारावारच राहात नसे १९४० सालीं कन्या ईदर यांचाहि विवाह झाला आणि त्या वेळीं "आपला संसार आतां पूर्णत्वाला गेला" असें उद्गार 'बी. पीं.'नीं काढले.

'बी. पीं.'च्या मनांत कधींकधीं उद्विग्नता येत असे; ती युद्ध वार्तेमुळें. सारें जग युद्धाच्या गर्तेंत सांपडलें होतें आणि हुकुमशाहीचें राक्षसी थैमान युरोपांत सुरू होतें. तरी पण विश्वबंधुत्वाच्या तत्त्वाचा साक्षात्कार 'बी. पीं.'ना झाला होता व या चिरंतन तत्त्वाकडे आज ना उद्यां जग आदरानें पाहील ही आशा त्यांच्या मनीं होती.

—आतां त्यांच्या अखेरच्या चिरविश्रांतीचा काळ समीप आला होता. हृदयक्रिया हळूहळू मंदावूं लागली. सर्व प्रकारें निरवानिरव करून—आणि स्काउट/गाईड्ना आपले अखेरचे शब्द लिहून ठेवून ८ जानेवारी १९४१ या दिवशीं 'बी. पी.' परमेश्वरचरणीं

लीन झाले! आपल्या कार्याची अमर पताका त्यांनीं जगभर फडकावीत ठेवलीं.

केनियांतील स्काउटस् व सैनिक यांनीं 'बी. पीं.'च्या शवाला अखेरची मानवंदना दिली व त्यांच्या देहाचें दफन करण्यांत आलें. त्यांची एक स्मारक शिला तेथें बसविण्यांत आली. त्यावर 'बी.पीं.'च्या असंख्य पदव्यांपैकीं "चीफ स्काउट ऑफ दि वर्ल्ड" ही एकच पदवी लिहिली आहे, ही किती अर्थपूर्ण गोष्ट आहे!

युद्धाच्या धुमश्चक्रीमध्यें 'बी. पीं.'च्या निधनवार्तेला प्रमुख स्थान लाभलें नाहीं, पण त्यानंतर दि. २३ एप्रिल १९४७ या दिवशीं या वार्तेला जागतिक प्रसिद्धि देण्यांत आली आणि ड्यूक ऑफ ग्लूसेस्टर यांच्या हस्तें इंग्लंडमध्येंहि एक सुंदरशी स्मारकशिला उभारण्यांत आली. इंग्लंडच्या थोर राष्ट्रवीर ऐतिहासिक व्यक्तींच्या पंक्तीला 'बी. पीं.'ना स्थान मिळालें, एवढेंच नव्हे तर राष्ट्रवादा-पलीकडे जाऊन मानवाबद्दल विचार करणाऱ्या लक्षावधि स्त्री-पुरुषांच्या हृदयांत त्यांना आदराचें स्थान लाभलें! अशा थोर पुरुषाला आपणहि आदरांजलि वाहूं या.

**Be Prepared.**

# सामान्य जनतेला 'बी. पीं.'चा अन्तिम संदेश

माझें जीवन अत्यंत सुखपूर्ण आहे; व तें केवळ स्वगृहींच नव्हे तर बाह्य जगामध्येंहि. आपणांपैकीं शेंकडों लोकांनीं नव्हे तर हजारोंनीं माझ्यावर लोभ केला त्याबद्दल स्वगृहीं जाण्यापूर्वी मी धन्यवाद देतों.

सर्व साम्राज्यांतून सर्व जीवनभर जनतेनें आणि स्काउटबंधूंनीं माझ्यासाठीं शुभेच्छा दर्शविल्या. केवळ स्वदेशबांधवांनींच नव्हे तर तर परदेशांतील लोकांनींहि मला मित्रभावानें वागविलें. त्यांच्यासाठीं खरोखरीच मी कांहीं करूं शकलों असेन असें मला वाटत नाहीं. पूर्ण अपरिचित अशा लोकांनींहि मजबद्दल जे भाव प्रदर्शित केले तो केवळ त्यांच्या सुशील वर्तणुकींतील भाग आहे. आणि प्रेमभावाची हीच भावना भावी पिढ्यांमध्यें अधिक वृद्धिंगत होईल अशी मला आशा वाटते. लोक सुखी होतील आणि विश्वशांतीचा आदर्श केवळ उपदेशांत न राहतां कार्यवाहींत आणला जाईल.

८० वर्षांहून अधिक अशा लोटलेल्या कालखंडाकडे नजर टाकल्यास मला असें वाटतें कीं तो अत्यल्प होता. आणि असेंहि वाटतें कीं क्रोधासारख्या विकाराला आणि राजकीय प्रश्नांना जीवनाच्या दृष्टीनें किती अल्प मूल्य आहे ! सर्वांमध्यें श्रेष्ठ कर्तव्य कोणतें असेल तर तें हें कीं, खूप उद्योग करावा आणि दुसऱ्याच्या जीवनामध्येंहि थोडेंसें सुख निर्माण करण्याचा प्रयत्न करावा.

—बेडन पॉवेल.

# 'बी. पी.' चे अन्तिम संदेश.

प्रिय स्काउटस्,—

तुम्हीं 'पीटर पॅन' हें नाटक कधीं पाहिलें आहे का? त्यांतील चांचेगिरी करणारा तुम्हांला आठवतो का? आपलें अंतिम भाषण तो वारंवार करीत असे. त्याला अशी भीति वाटे न जाणों आपल्या मृत्युसमयीं कदाचित् आपण शुद्धीवरहि राहणार नाहीं आणि त्यामुळें आपणांस भाषणहि करतां येणार नाहीं. माझीसुद्धां तशीच गोष्ट आहे. मी कांहीं आतांच मरत नाहीं, पण आतां केव्हां ना केव्हां तरी मरणारच. म्हणून प्रयाणापूर्वींचा संदेश आपणांस देण्याची माझी इच्छा आहे. माझा हा शेवटचाच शब्द असेल हें लक्षांत ठेवून याबद्दल खूप खूप विचार करा.

माझें जीवन अत्यंत सुखमय होतें. आपलेंहि तसेंच व्हावें अशी माझी मनोकामना आहे. आपण या पृथ्वीतलावर राहावें, जीवन व सुख यांचा आस्वाद घ्यावा यासाठीं परमेश्वरानें आपणांस पाठविलें आहे. पैशामुळें, विजयामुळें किंवा आत्मसंतोषामुळेंहि सुख मिळत नाहीं असा माझा विश्वास आहे. आपण बाल्यावस्थेंत निरोगी-पणा व शक्ति संपादन करावी आणि तारुण्यांत किंवा प्रौढावस्थेंत परोपकारार्थ तिचा उपयोग करून तज्जन्य आनंदी जीवनाचा लाभ घ्यावा; हेंच सुखी जीवनाची वाटचाल करतांना पहिलें पाऊल आहे.

सृष्टिनिरीक्षण केल्यास, जग हें आश्चर्यकारक व सौंदर्यपूर्ण गोष्टींनीं खच्चून भरलें असून तें आपल्याच उपभोगासाठीं आहे असें

आढळून येईल. आपणांस जें प्राप्त होईल त्यामध्यें संतोष मानून त्याचा अत्यंत उचित उपयोग करा. कोणत्याहि गोष्टीच्या अपवित्र अंगाकडे न पाहतां आंतील मांगल्य पहा.

दुसऱ्यांना सुख देणें हाच स्वतः सुखी होण्याचा खरा मार्ग आहे. आपण जगांत आल्यावर तें ज्या अवस्थेंत पाहिलें त्यापेक्षां तें अधिक चांगलें करण्याचा यत्न करावा, म्हणजे मरणसमयींहि आपलें चित्त प्रसन्न राहील. आपण कालापव्यय केला नाहीं उलट जगांत सत्कार्य आपण केलें, असा त्या वेळीं मनांत विचार तरंगेल.

प्रसन्नतेनें जगावयास आणि आनंदानें मरणाच्या स्वागतास तयार व्हा. बाल्याची हद्द ओलांडल्यावरहि स्काउट-प्रतिज्ञेवर अढळ राहा. त्यासाठीं ईश्वर आपणांस साहाय्य करो.

—बेडन पॉवेल.

# गाईड्सना अंतिम संदेश

प्रिय गाईड्स्—

तुमच्याशीं माझें हें निरोप घेण्यापूर्वींचें बोलणें आहे.

मीं आपणांस सांगितलें आहेच कीं आपल्या जीवनाचा उद्देश स्वतः सुखी होणें व दुसऱ्यांनाहि सुखी करणें हा आहे. याची सदैव आठवण ठेवा. दुसऱ्याच्या सुखासाठीं आपणांस झटावयास मिळणें ही सुखद गोष्ट नाहीं का? स्वतःच्या सुखासाठीं स्वतंत्र आटापिटा मुळींच करूं नका. इतरांना सुखी करण्याच्या प्रयत्नांत सुख तुमच्याकडे आपणहून चालत येईल. मोठेपणीं तुम्ही स्वतःचें घरीं जाल तेव्हां तें घर स्वच्छ नीटनेटकें ठेवून पतीला आनंदित कराल. मग स्वगृहीं प्रसन्नता व प्रकाश नांदत असतां तें सोडून पुरुष सुखासाठीं कधीं बाहेर जाईल का?

पण या सगळ्यासाठीं परिश्रमांची आवश्यकता आहे. परिश्रम स्वहस्तेंच पारितोषिकहि तुमच्यासाठीं घेऊन येतात. आपल्या मुलाबाळांना तुम्ही स्वच्छ, निरोगी आणि उद्योगी बनविलेत तर तीं सुखी होतील. आनंदी मुलांचें आपल्या आई-वडिलांवर नेहमींच प्रेम असतें. तुमच्या प्रिय बालकांपासून जें सुख तुम्हांला मिळेल त्यापेक्षां थोर अशी कोणतीच गोष्ट नाहीं. आपलीं जीवनें सुखमय व्हावींत अशीच परमेश्वरी इच्छा आहे; अशी माझी श्रद्धा आहे. त्यानें आश्चर्ययुक्त व सौंदर्यपूर्ण असें हें जग आपल्या हवालीं केलें आहे. तें पाहाण्यासाठीं केवळ डोळेच आपणांस दिलेत असें नाहीं तर सर्व गोष्टी समजण्यासाठीं बुद्धीहि दिली आहे. इकडे दुर्लक्ष करूं नये. सूर्यनारायणाच्या प्रकाशापासून आणि सुंदर निसर्गदृश्यें पाहून आपणांस आनंद मिळतो. फुलांमध्यें मूर्तिमंत सौंदर्यच असतें.

बीजापासून छोटेंसें झुडूप निर्माण होतें. त्याला फुलें येतात. एक फूल गळून जातांच त्याची जागा दुसरें पुष्प घेतें. या गोष्टी पाहून आपणांस आश्चर्य वाटतें. मानवाप्रमाणें झाडेंहि मर्त्य असलीं तरी त्यांची वंशवेल नष्ट होत नाहीं. "निर्मात्या"ची योजना पुढें चालूच राहाते.

दोन प्रकारची सेवा करण्यासाठीं स्त्रीजातीची निवड देवानें केली आहे. बालकांना जन्म देऊन वंशसातत्य टिकविणें, पूर्वीं होऊन गेलेल्या पिढीची जागा भरून काढणें; आणि पति, मुलें यांच्या सहकार्यानें सुखी कुटुंबजीवन निर्माण करून जगालाहि सुखी करणें. हेंच खरोखर तुम्हां गाईड्सचें विशेष कार्यक्षेत्र आहे.

आपल्या पतीच्या कामामध्यें, त्याच्या इच्छा आकांक्षांमध्यें स्वतःची आवड विलीन करून, आपली सहानुभूति व सहकार्य देऊन तुम्ही साहाय्य करूं शकाल, आणि मार्गदर्शनहि करूं शकाल. आपल्या बालकांचीं मनें व वर्तन पवित्र पण खंबीर बनवा. सुदृढ शरीर व निरोगी जीवन त्यांना मिळवून द्या. त्यायोगें मुलें खरा जीवनानंद उपभोगण्यास पात्र बनूं शकतील. अशा तऱ्हेनें प्रेम आणि सुख देऊन त्याचे बदल्यांत पति व मुलें यांचें प्रेम तुम्ही संपादन करूं शकाल तर त्यापेक्षां या भूतलावर कोणतीहि गोष्ट अधिक सुखद नाहीं; याउपर स्वर्ग वेगळा नाहीं. स्वर्ग या जगांतच व स्वगृहींच आहे. यासाठीं हीं आनंदप्राप्तीची वाट दुसऱ्यांनाहि दाखवा. याप्रमाणें वागलांत तर तुम्हांलाहि सुख लाभेल. आणि याचीच अपेक्षा परमेश्वर तुम्हांपासून करीत आहे.

ईश्वर तुम्हांस साहाय्य करो. ...गत.

—बेडन पॉवेल.

नों. दि.

REFBK-0009860

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ८८९०